दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | मंगळवार, दि. ०९ जून, २०२६ | वर्ष - १ | अंक - २५४ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड

### आजचे पंचांग

मंगळवार, दि. ९ जून २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२८, शालिवाहन शक १९४८, विक्रम संवत २०८२, पराभवनाम संवत्सर, उत्तरायण, ग्रीष्म ऋतु, अधिक ज्येष्ठ मास, कृष्णपक्ष, नवमी रात्री २-३५ पर्यंत नंतर दशमी तिथी, दिवस नक्षत्र– पूर्वाभाद्रपदा सकाळी ९-४० पर्यंत नंतर उत्तराभाद्रपदा, चंद्र रास - मीन, सूर्य रास - वृषभ, गुरु रास - कर्क

### पुण्यात पाणीकपात

**पुणे** : पुण्याला पाणीपुरवठा करणाऱ्या तलावांतील पाण्याची पातळी घटत आहे. अद्याप पाऊस सुरू झालेला नाही. या पार्श्वभूमीवर पुणे मनपाने शहरात पुढील आठवड्यापासून पाणीकपात लागू करण्याची तयारी सुरू केली आहे. नागरिकांना पाणी जपून वापरण्याचे आवाहन मनपाने केले आहे. पुढील आठवड्यात सोमवारपासून संपूर्ण पुणे शहरात एक दिवसाआड पाणीपुरवठा करण्याचे नियोजन आहे. पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे यांनी ही माहिती दिली.

## सारांश वृत्त

### पद्म पुरस्कार २३ जून रोजी प्रदान

**नवी दिल्ली** : राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते २३ जून रोजी राष्ट्रपती भवनात होणाऱ्या नागरी पुरस्कार सोहळ्याच्या दुसऱ्या टप्प्यात ज्येष्ठ अभिनेते ममूटी, आर. माधवन आणि सतीश शाह यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांना पद्म पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. यंदासाठी राष्ट्रपतींनी एकूण १३१ पद्म पुरस्कारांना मंजुरी दिली आहे. यामध्ये पाच पद्मविभूषण, १३ पद्मभूषण आणि ११३ पद्मश्री पुरस्कारांचा समावेश आहे.

### काँग्रेसच्या व्यक्तव्यांवर माकप नाराज

**नवी दिल्ली** : विधानसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांनी केलेल्या वक्तव्यांबाबत मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने (माकप) नाराजी व्यक्त केली आहे. इंडिया आघाडीच्या सोमवारी झालेल्या बैठकीत हा मुद्दा उपस्थित करण्यात आला. माकपचे सरचिटणीस एम. ए. बेबी यांनी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांना पत्र लिहून निवडणूक प्रचारातील काही वक्तव्यांवर आक्षेप नोंदवला आहे. या प्रकारची विधाने सहकार्याच्या भावनेशी सुसंगत नसल्याचे पत्रात नमूद करण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली.

### केरळमध्ये रेल्वेच्या दुपदीकरणाला मंजुरी

**अलाप्पुझा** : केरळमधील मरारीकुलम ते अलाप्पुझा दरम्यानच्या १०.६५ किलोमीटर लांबीच्या रेल्वेमार्गाच्या दुपदरीकरणाला भारतीय रेल्वेने मंजुरी दिली आहे. या प्रकल्पामुळे दक्षिण रेल्वेच्या जाळ्याची क्षमता वाढण्यासह रेल्वे वाहतुकीची कार्यक्षमता सुधारण्यास मदत होणार आहे. रेल्वे मार्गांवरील वाढती वाहतूक लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे.

### १२ दिवसांत ३.५७ कोटींची कारवाई

# भेसळमाफियांवर तुकाराम मुंढेंचा प्रहार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : अन्न आणि औषध प्रशासन (एफडीए) आयुक्तपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर तुकाराम मुंढे यांनी राज्यभर भेसळखोर, गुटखा तस्कर, बनावट औषध विक्रेते आणि बेकायदेशीर खाद्य व्यवसायांविरोधात आक्रमक मोहीम उघडली आहे.

'सेफ फूड, सेफ ड्रग्स, सेफ महाराष्ट्र' या संकल्पनेअंतर्गत अवघ्या १२ दिवसांत राज्यभरात ३९८ हून अधिक धाडी टाकण्यात आल्या असून ३ कोटी ५७ लाख रुपयांपेक्षा अधिक किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या कारवाईत २९४ जणांना अटक करण्यात आली असून १०० हून अधिक दुकाने व गोदामे सील करण्यात आली आहेत.



२५ मेपासून सुरू झालेल्या या विशेष मोहिमेमुळे राज्यातील भेसळमाफिया आणि अवैध व्यवसाय करणाऱ्यांमध्ये प्रचंड खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे, जूनच्या पहिल्या पाच दिवसांतच कारवाईचा वेग आणखी वाढविण्यात आल्याने एफडीएच्या धडक कारवायांचा प्रभाव सर्वत्र दिसून येत आहे.

ग्राहकांची दिशाभूल करणाऱ्या आणि भ्रामक दावे करणाऱ्या औषध कंपन्यांवरही एफडीएने कारवाईचा बडगा उगारला आहे. पतंजली आयुर्वेदच्या 'दिव्या फार्मसी'च्या मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, अमरावती आणि छत्रपती संभाजीनगर येथील १२ विक्री केंद्रांवर एकाच वेळी छापे टाकण्यात आले. या कारवाईत ७३ लाख २४ हजार रुपयांचा आक्षेपार्ह औषधसाठा जप्त करण्यात आला.

राज्यात बंदी असलेल्या गुटखा आणि सुगंधी तंबाखूच्या व्यापाराविरोधात एफडीएने पोलिसांच्या मदतीने मोठे जाळे उभे केले आहे. धाराशिव जिल्ह्यातील परांडा येथे १ कोटी २ लाख रुपयांचा गुटखा व वाहतूक साधने जप्त करून दोघांना अटक करण्यात आली. समृद्धी महामार्गावरील सावंगी टोलनाक्यावर ६० लाख ५० हजार रुपयांचा गुटखा पकडण्यात आला. पिंपरी-चिंचवडमधील मोशी परिसरात ६ लाख रुपयांहून अधिक किमतीचा गुटखा जप्त करण्यात आला, तर नांदेडमध्ये १७.५० लाख रुपयांचा साठा पकडण्यात आला.

जळगावमध्ये गाईच्या दुधात खाद्यतेल मिसळून कृत्रिम दूध तयार करणाऱ्या रॅकेटचा पर्दाफाश करण्यात आला. पुणे जिल्ह्यातील आंबेगाव आणि खेड भागात फरसाण व हिरव्या वाटाण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या घातक रासायनिक रंगाचा साठा जप्त करण्यात आला. या कारवाईत १९ लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. मुंबईतील धारावी, धुळे येथील अवधान एमआयडीसी आणि इतर ठिकाणी अस्वच्छ वातावरणात नूडल्स, नमकीन आणि खाद्यपदार्थ तयार करणाऱ्या आस्थापनांवर कारवाई करून त्यांना व्यवसाय बंदच्या नोटिसा देण्यात आल्या.

एफडीएच्या मोहिमेला अधिक धार देण्यासाठी आयुक्त मुंढे यांनी काही महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. यात, बेकायदेशीर गुटखा किंवा भेसळीचा माल साठवण्यासाठी जागा देणाऱ्या घरमालकांवरही थेट गुन्हे दाखल करण्याचे आदेश, भ्रामक जाहिराती करणाऱ्या कंपन्यांसह त्या उत्पादनांच्या जाहिरातीत सहभागी सेलिब्रिटींवर कारवाईचा इशारा, विनापरवाना किंवा अस्वच्छ खाद्य आस्थापनांना कोणतीही मुदत न देता थेट सील करण्याचा निर्णय, नियमित तसेच अचानक तपासणी मोहीम राबविण्याचे आदेश यांचा यात समावेश आहे.

# सीजेपीचे ११ तारखेला पुण्यात आंदोलन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी कॉकरोच जनता पक्षाने पुण्यात आंदोलन करण्याची घोषणा केली आहे. पक्षाचे संस्थापक अभिजीत दीपके यांनी ही माहिती दिली. दिल्लीतील जंतरमंतर येथे आंदोलन केल्यानंतर पक्षाचे हे दुसरे मोठे आंदोलन असणार आहे.

पक्षाने समाजमाध्यमांवर प्रसिद्ध केलेल्या माहितीनुसार, महाराष्ट्राची शैक्षणिक राजधानी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुण्यात हे आंदोलन आयोजित करण्यात आले आहे. गुरुवार, ११ जून रोजी दुपारी ४ वाजता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर आंदोलन करण्यात येणार असल्याचे जाहीर करण्यात आले आहे. यापूर्वी ६ जून रोजी नवी दिल्लीतील जंतरमंतर येथे कॉकरोच जनता पक्षाने पहिले आंदोलन केले होते. या आंदोलनात विद्यार्थी, तरुण आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतल्याचा दावा पक्षाकडून करण्यात आला आहे.

या आंदोलनासाठी पक्षाचे संस्थापक अभिजीत दीपके अमेरिकेतून भारतात आले होते. तसेच पर्यावरण क्षेत्रात कार्यरत असलेले सोनम वांगचुक यांनीही आंदोलनाला उपस्थिती लावल्याचा पक्षाचा दावा आहे. जंतरमंतरवरील आंदोलनादरम्यान शिक्षण व्यवस्थेतील विविध प्रश्न, परीक्षा प्रक्रियेतील कथित त्रुटी आणि शैक्षणिक धोरणांबाबत नाराजी व्यक्त करण्यात आली होती. याच मागण्यांचा पुनरुच्चार पुण्यातील आंदोलनात करण्यात येणार असल्याचे अभिजीत दीपके यांनी सांगितले.

# दुष्काळाच्या प्रश्नावर सर्वपक्षीय बैठक बोलवा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नागपूर** : राज्यात लांबलेल्या मान्सूनमुळे निर्माण झालेली परिस्थिती, अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीचा प्रश्न आणि कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या अडचणी लक्षात घेता राज्य सरकारने तातडीने सर्वपक्षीय बैठक बोलवावी, अशी मागणी काँग्रेसचे विधिमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे. शेतकरी आणि राज्यासमोरील विविध प्रश्नांवर सर्वसमावेशक चर्चा होणे आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

यंदाचा उन्हाळा राज्यासाठी त्रासदायक ठरला असून मान्सूनच्या विलंबामुळे अनेक भागांमध्ये दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. अशा पार्श्वभूमीवर सरकारने सर्व राजकीय पक्षांना विश्वासात घेऊन उपाययोजनांवर चर्चा करावी, असे वडेट्टीवार यांनी सांगितले. यावेळी त्यांनी महायुती सरकारने जाहीर केलेल्या शेतकरी कर्जमाफीवरही टीका केली. सरकारची कर्जमाफी योजना ही सरसकट नसून अनेक अटी-शर्तींनी युक्त असल्याने मोठ्या संख्येने शेतकरी लाभापासून वंचित राहणार असल्याचा आरोप त्यांनी केला.

आघाडी सरकारच्या काळातील कर्जमाफीचा लाभ घेतलेल्या लाखो शेतकऱ्यांना नव्या योजनेतून वगळण्यात आल्याने प्रत्यक्ष लाभार्थ्यांची संख्या सरकार सांगत असलेल्या आकडेवारीपेक्षा कमी राहील, असा दावा त्यांनी केला.

### सुरक्षित वाहतुकीसाठी ६५ प्रकल्पांना मंजुरी

# फाटकमुक्त रेल्वेसाठी विशेष पायाभूत सुविधा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : राज्यातील रेल्वे फाटकांचे उच्चाटन करून सुरक्षित आणि सुलभ वाहतूक व्यवस्था निर्माण करण्याच्या दिशेने मोठे पाऊल टाकत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत महाराष्ट्र रेल्वे पायाभूत सुविधा विकास महामंडळाच्या (महारेल) ६५ प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली. राज्यभरात प्रस्तावित १३१ कामांपैकी पहिल्या टप्प्यातील या प्रकल्पांना हिरवा कंदील देण्यात आला आहे.

सह्याद्री अतिथिगृह येथे झालेल्या बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस यांनी महाराष्ट्र रेल्वे फाटकमुक्त करण्याचे उद्दिष्ट ठेवून आवश्यक



पायाभूत सुविधा उभारण्याचे निर्देश दिले. रेल्वे उड्डाणपूल, पादचारी पूल आणि रेल्वेमार्गाखालील अंडरपास यांसारखी कामे महारेलमार्फत करण्यात येणार आहेत.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्यातील कोणत्याही रेल्वेमार्गावर फाटक शिल्लक राहता कामा नये. वाढते शहरीकरण आणि वाहतुकीचा ताण लक्षात घेऊन नागरिकांच्या दळणवळणासाठी आवश्यक सुविधा उभारल्या पाहिजेत. मंजूर झालेल्या ६५ प्रकल्पांमध्ये कमी भूसंपादन आवश्यक असलेल्या आणि २५ हजार ते एक लाख ट्रेन व्हेईकल युनिट (टीव्हीयू) असलेल्या मार्गांवरील कामांना प्राधान्य देण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

राज्यातील प्रमुख शहरांमध्ये एकूण ८० रेल्वे पायाभूत सुविधा प्रकल्पांचे नियोजन करण्यात आले आहे. या प्रकल्पांच्या पडताळणीसाठी संबंधित महापालिका आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांची समिती स्थापन करण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले. समितीच्या अहवालानंतर महारेलकडून कामे हाती घेतली जाणार आहेत.

नागपूर शहरातील काही उड्डाणपुलांवर भविष्यात वाहतूक कोंडी होण्याची शक्यता लक्षात घेऊन आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचना मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिल्या. तसेच अमरावती-बडनेरा मार्गावरील जुन्या रेल्वे उड्डाणपुलाच्या ठिकाणी नवीन पूल उभारण्याचे निर्देशही त्यांनी दिले. या प्रकल्पांसाठी हुडकोमार्फत निधी उभारण्याची सूचना करण्यात आली असून, महारेलला सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत आणण्याची प्रक्रिया वेगाने पूर्ण करण्याचे निर्देशही देण्यात आले.

प्रस्तावित ८० प्रकल्पांमध्ये मुंबई महानगर क्षेत्रातील १७, पुण्यातील १५, नागपूरमधील १३, नाशिक आणि अमरावतीतील प्रत्येकी ५, सांगलीतील ४, छत्रपती संभाजीनगर आणि कोल्हापूरमधील प्रत्येकी ३ तसेच इतर शहरांतील विविध प्रकल्पांचा समावेश आहे. राज्यातील रेल्वे क्रॉसिंगवरील अपघातांचे प्रमाण कमी करण्यासह वाहतुकीचा वेग वाढविण्यासाठी या प्रकल्पांचा मोठा फायदा होणार असल्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

### वर्धापन दिन सोहळा पुढे ढकलला

# एनडीए बैठकीमुळे राष्ट्रवादीच्या कार्यक्रमात बदल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा २७ वा वर्धापन दिन सोहळा यंदा एक दिवस पुढे ढकलण्यात आला असून आता हा कार्यक्रम ११ जून रोजी दुपारी २ वाजता मुंबईतील किंग्ज सर्कल येथील षण्मुखानंद सभागृहात आयोजित करण्यात येणार आहे. एनडीएची नवी दिल्लीत होणारी महत्त्वपूर्ण बैठक लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती प्रदेशाध्यक्ष तथा खासदार सुनील तटकरे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना १० जून १९९९ रोजी झाली होती. दरवर्षी याच दिवशी वर्धापन दिन साजरा केला जातो. मात्र यंदा १० जून रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एनडीए घटक पक्षांची बैठक बोलावल्याने पक्षाच्या प्रमुख नेत्यांना दिल्लीत उपस्थित राहावे लागणार आहे.

सुनील तटकरे यांनी सांगितले की, देशभरातील एनडीए घटक पक्षांचे प्रमुख नेते, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि खासदार या बैठकीत सहभागी होणार आहेत. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षा व उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, खासदार प्रफुल्ल पटेल आणि पक्षाचे वरिष्ठ नेते १० जून रोजी दिल्लीत असतील.

एनडीए सरकारच्या दोन वर्षांच्या कामगिरीचा आढावा, देशाच्या विकासाची दिशा आणि आगामी राजकीय रणनीती यावर या बैठकीत चर्चा होणार असल्याचे तटकरे यांनी सांगितले. तसेच केवळ वर्धापन दिनाच्या तारखेत बदल करण्यात आला असून कार्यक्रमाचे स्थळ पूर्वीप्रमाणेच षण्मुखानंद सभागृह राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यंदाचा वर्धापन दिन विशेष महत्त्वाचा मानला जात असून तो पक्षाच्या दिवंगत नेतृत्वाला समर्पित करण्यात येणार आहे. या निमित्ताने पक्षाची आगामी वाटचाल, संघटनात्मक विस्तार आणि भविष्यातील राजकीय आव्हानांबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे.

संघटनात्मक बांधणीबाबत बोलताना तटकरे यांनी पक्षाला आगामी निवडणुकांसाठी सज्ज करण्यावर भर देण्यात येणार असल्याचे सांगितले. बूथ स्तरापासून राष्ट्रीय स्तरापर्यंत पक्ष मजबूत करण्यासाठी राज्यभर संघटनात्मक मोहीम राबविण्यात येणार असून राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार यांचा राज्यव्यापी दौरा देखील नियोजित करण्यात येणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

### उत्तराखंडमध्ये एसआयआरला प्रारंभ

**डेहराडून** : उत्तराखंडमध्ये मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरावलोकन मोहिमेला सोमवारी प्रारंभ झाला. मोहिमेच्या पहिल्याच दिवशी राज्यभरात २.५५ लाखांहून अधिक गणना अर्जांचे वितरण करण्यात आले असल्याची माहिती निवडणूक अधिकाऱ्यांनी दिली. राज्यात १ जुलै २०२६ ही पात्रता तारीख निश्चित करून मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरावलोकन राबविण्यात येत आहे. या उपक्रमाद्वारे मतदार यादीतील नोंदी अद्ययावत करणे, पात्र नागरिकांची नावे समाविष्ट करणे आणि त्रुटी दूर करण्याचे काम केले जाणार आहे. राज्यपाल गुरमित सिंह यांना राजभवनात गणना अर्ज प्रदान करण्यात आला.

# ३३.६ एकर जमीन शासनाच्या ताब्यात

### आरेतील झोपडपट्टी पुनर्वसनाचा २० वर्षांपूर्वीचा निर्णय रद्द

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : आरे दुग्ध वसाहतीमधील झोपड पट्टीधारकांच्या पुनर्वसनासाठी २००६ मध्ये घेण्यात आलेला शासन निर्णय राज्य सरकारने रद्द केला आहे. या निर्णयानुसार पुनर्वसन प्रकल्पासाठी देण्यात आलेली ३३.६ एकर जमीन शासनाने पुन्हा ताब्यात घेण्याचा निर्णय घेतला आहे.

आरे परिसर पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील आणि हरित पट्टा क्षेत्रात येत असल्याने येथे कोणत्याही प्रकारचे पुनर्वसन अथवा बांधकाम प्रकल्प राबविणे शक्य नसल्याचे शासनाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे मे. बामकोटेक प्रा. लि. यांना संयुक्त उपक्रम तत्त्वावर देण्यात आलेल्या प्रकल्पास मंजुरी देणारा २८ जून २००६ रोजीचा शासन निर्णय रद्द करण्यात आला आहे.

आरेतील झोपडपट्टीधारकांच्या पुनर्वसनासाठी मौजे पहाडी, गोरेगाव येथील सीटीएस क्रमांक ५८९-अ मधील ३३.६ एकर जमीन कंपनीला देण्यात आली होती. मात्र ही जमीन ना-विकास क्षेत्रात असल्याने पुनर्वसन प्रकल्पास विरोध करत मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यात आली होती.

मुंबई उच्च न्यायालयाने संबंधित प्रकरणाचा निकाल देताना आरे परिसरातील पर्यावरणीय मर्यादांचा विचार केला. पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालयाने ५ डिसेंबर २०१६ च्या अधिसूचनेनुसार आरे परिसराला पर्यावरण संवेदनशील क्षेत्र म्हणून घोषित केले आहे. महानगरपालिकेच्या २०१४ ते २०३४ विकास आराखड्यातही हा परिसर हरित पट्टा म्हणून अधिसूचित करण्यात आला आहे. सदर भागात कोणत्याही प्रकारची बांधकामे किंवा पुनर्वसनाची कामे करता येणार नसल्याचे नमूद करत शासनाने २००६ चा निर्णय रद्द केला.

### इंडिया आघाडीकडून एकतेचा संदेश

# राजधानी दिल्लीत विरोधकांचे शक्तिप्रदर्शन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : विरोधी पक्षांच्या इंडिया आघाडीच्या बैठकीत सोमवारी विविध पक्षांच्या नेत्यांनी एकजुटीचे महत्त्व अधोरेखित करत लोकशाही मूल्यांचे संरक्षण आणि जनतेच्या उपजीविकेशी संबंधित प्रश्नांवर संयुक्तपणे लढा देण्याचा निर्धार व्यक्त केला. राजधानीतील कॉन्स्टिट्यूशन क्लब येथे झालेल्या या बैठकीकडे देशाच्या राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले होते.

विरोधी पक्षांच्या इंडिया आघाडीच्या नेत्यांनी सोमवारी नवी दिल्लीत झालेल्या महत्त्वपूर्ण बैठकीत निवडणूक प्रक्रियेशी संबंधित मुद्द्यांवर




चर्चा करत विशेष सखोल पुनरावलोकन (एसआयआर) आणि कथित मतदार यादीतील अनियमिततांबाबत भारताचे सरन्यायाधीश यांना पत्र पाठविण्याचा निर्णय घेतला. तसेच नीट आणि सीबीएसई परीक्षा प्रक्रियेभोवती निर्माण झालेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून तातडीने राजीनामा द्यावा, अशी मागणीही बैठकीत करण्यात आली.

काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना बेरोजगारी, महागाई, शेतकऱ्यांच्या समस्या, समाजातील वंचित घटकांवरील अन्याय आणि देशातील सध्याची आर्थिक परिस्थिती या महत्त्वाच्या विषयांवर चर्चा करण्यासाठी केंद्र सरकारने सर्वपक्षीय बैठक बोलवावी, अशी मागणी केली. त्यांनी सांगितले की, इंडिया आघाडीतील पक्षांमध्ये अधिक समन्वय राखण्यासाठी दर दोन महिन्यांनी बैठक घेण्याचा निर्णय झाला असून पुढील बैठक हैदराबाद येथे होणार आहे. बैठकीची निश्चित तारीख लवकरच जाहीर करण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

या बैठकीला काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी, लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी, समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव, राष्ट्रीय जनता दलाचे नेते तेजस्वी यादव, नॅशनल कॉन्फरन्सचे ओमर अब्दुल्ला, पीडीपीच्या मेहबूबा मुफ्ती, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे तसेच डावे पक्ष आणि इतर घटक पक्षांचे नेते उपस्थित होते. राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या सुप्रिया सुळे, भाकपचे डी. राजा आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे जॉन ब्रिटास यांनीही बैठकीत सहभाग घेतला. मात्र द्रमुक आणि आम आदमी पक्ष या बैठकीला उपस्थित नव्हते. आम आदमी पक्षाने यापूर्वीच आघाडीतून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला असून द्रमुकनेही बैठकीपासून दूर राहण्याचा निर्णय घेतल्याचे सांगण्यात आले.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, आगामी विधानसभा निवडणुका आणि २०२९ च्या लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर विरोधी पक्षांच्या रणनीतीवर बैठकीत चर्चा झाली. अलीकडील राजकीय घडामोडी, विविध राज्यांतील निवडणूक निकाल आणि भाजपविरोधात प्रभावी राजकीय पर्याय उभा करण्याबाबतही विचारमंथन करण्यात आले.

# विशाखापट्टणम स्टील प्लांटमध्ये भीषण दुर्घटना

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**हैदराबाद** : आंध्र प्रदेशातील विशाखापट्टणम येथील स्टील प्लांटमध्ये झालेल्या भीषण औद्योगिक दुर्घटनेत आठ कामगारांचा मृत्यू झाला असून अनेक जण जखमी झाले आहेत. वितळलेल्या पोलादाची वाहतूक करताना झालेल्या स्फोटामुळे हा अपघात घडल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अत्यंत उच्च तापमानावर वितळवण्यात आलेले पोलाद क्रेनच्या साहाय्याने एका विभागातून दुसऱ्या विभागात नेले जात होते. यावेळी वितळलेल्या पोलादाने भरलेल्या लॅडलमध्ये अचानक स्फोट झाला. त्यानंतर उकळत्या पोलादाचा लाव्हा खाली सांडल्याने परिसरातील कामगार त्याच्या विळख्यात सापडले.

गरम पोलाद थेट अंगावर पडल्याने आठ कामगारांचा जागीच मृत्यू झाला, तर अनेक जण गंभीररित्या भाजले गेले. दुर्घटनेनंतर एकच गोंधळ उडाला असून कामगारांनी जीव वाचवण्यासाठी धावाधाव केली. अग्निशमन व आपत्कालीन पथके घटनास्थळी दाखल झाली. आग नियंत्रणात आणण्यासह बचावकार्य सुरू करण्यात आले. अपघाताच्या नेमक्या कारणांचा शोध घेण्यासाठी चौकशी सुरू करण्यात आली आहे.

दरम्यान, एन. चंद्राबाबू नायडू यांनी दुर्घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले आहे. त्यांनी मृत कामगारांना श्रद्धांजली अर्पण करत त्यांच्या कुटुंबीयांप्रती संवेदना व्यक्त केल्या.

## संपादकीय

# विरोधी राजकारणाची महत्त्वाची कसोटी



**इंडिया आघाडीची दिल्लीत झालेली बैठक विरोधी पक्षांच्या एकजुटीचा संदेश देणारी ठरली असली, तरी त्याचवेळी तृणमूल काँग्रेसमधील अंतर्गत घडामोडींनी राजकीय चर्चांना वेग दिला आहे. विरोधी राजकारणाची ताकद आघाडीत नसून, घटक पक्षांच्या संघटनात्मक स्थैर्यातही दडलेली असते.**

दिल्लीत झालेल्या इंडिया आघाडीच्या अलीकडील बैठकीने राष्ट्रीय राजकारणात विरोधी पक्षांच्या एकजुटीचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आणला आहे. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर विरोधी पक्षांमध्ये अधिक समन्वय निर्माण करणे, समान राजकीय भूमिका ठरविणे आणि भारतीय जनता पक्षासमोर प्रभावी पर्याय उभा करणे, या उद्देशाने बैठकीत चर्चा झाल्याचे सांगितले जात आहे. अशा बैठका कोणत्याही लोकशाही व्यवस्थेत महत्त्वाच्या मानल्या जातात, कारण त्या पर्यायी राजकीय दृष्टिकोन मांडण्याची संधी उपलब्ध करून देतात. मात्र, या बैठकीसोबतच पश्चिम बंगालमधील तृणमूल काँग्रेसमधील काही घडामोडींनीही राजकीय विश्लेषकांचे लक्ष वेधून घेतले आहे. पक्षातील काही नेत्यांच्या नाराजीच्या चर्चा, वरिष्ठ नेत्यांशी संबंधित निर्णय आणि काही व्यक्तींविरोधात झालेली कायदेशीर कारवाई यामुळे तृणमूल काँग्रेसच्या अंतर्गत स्थितीबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. तथापि, या घटनांकडे पाहताना तथ्य आणि राजकीय तर्क-वितर्क यांमधील फरक समजून घेणे आवश्यक आहे. लोकशाहीतील कोणताही मोठा पक्ष हा विविध मतप्रवाह, प्रादेशिक हितसंबंध आणि नेतृत्वाच्या विविध स्तरांमधील संवाद यांवर आधारित असतो. त्यामुळे मतभेद किंवा नाराजीच्या चर्चा हे राजकीय जीवनाचा अविभाज्य भाग असतात. अशा चर्चांना लगेचच बंड, फूट किंवा अस्तित्वाचे संकट असे स्वरूप देणे योग्य ठरत नाही. कोणत्याही पक्षातील परिस्थितीचे मूल्यमापन करताना अधिकृत भूमिका, प्रत्यक्ष संघटनात्मक बदल आणि दीर्घकालीन राजकीय परिणाम यांचा विचार करणे आवश्यक असते. तृणमूल काँग्रेसच्या संदर्भात सध्या निर्माण झालेली चर्चा ही प्रामुख्याने पक्षातील काही घडामोडींवर आधारित आहे. काही वृत्तांमध्ये पक्षातील असंतोषाचा उल्लेख करण्यात आला आहे, तर काही निरीक्षकांनी नेतृत्वासमोरील संघटनात्मक आव्हानांबाबत चिंता व्यक्त केली आहे. परंतु या चर्चांमधून पक्षात व्यापक फूट पडत असल्याचा निष्कर्ष काढण्यासाठी पुरेसा पुरावा अद्याप उपलब्ध नाही. राजकीय पक्षांमध्ये वेळोवेळी उद्भवणारे मतभेद आणि संघटनात्मक प्रश्न हे त्यांच्या अंतर्गत प्रक्रियेचाच भाग असतात. याच पार्श्वभूमीवर इंडिया आघाडीच्या राजकारणाकडे पाहणे महत्त्वाचे ठरते. विरोधी पक्षांची ही आघाडी विविध राज्यांतील आणि विविध विचारसरणींच्या पक्षांनी बनलेली आहे. त्यामुळे तिचे सर्वात मोठे बळ म्हणजे व्यापक प्रतिनिधित्व, तर सर्वात मोठे आव्हान म्हणजे समन्वय. राष्ट्रीय स्तरावर एकत्र येणे आणि राज्यनिहाय राजकीय वास्तव यामध्ये अनेकदा फरक असतो. त्यामुळे प्रत्येक घटक पक्षाची अंतर्गत स्थिरता ही संपूर्ण आघाडीच्या विश्वासार्हतेशी जोडली जाते. याच कारणामुळे तृणमूल काँग्रेस संदर्भातील कोणतीही चर्चा इंडिया आघाडीच्या व्यापक राजकारणापासून पूर्णपणे वेगळी राहू शकत नाही. पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेस हा एक प्रभावी राजकीय घटक आहे आणि राष्ट्रीय स्तरावरही त्या पक्षाची भूमिका महत्त्वाची मानली जाते. त्यामुळे पक्षातील कोणत्याही संभाव्य अस्थिरतेकडे राजकीय निरीक्षकांचे लक्ष जाणे स्वाभाविक आहे. मात्र, एखाद्या पक्षातील आव्हाने आणि संपूर्ण विरोधी आघाडीच्या भवितव्यामध्ये थेट संबंध जोडताना सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. राजकीय पक्षांसमोरील खरे आव्हान हे विरोधकांशी लढण्याचे नसते; तर स्वतःची संघटनात्मक ताकद टिकवून ठेवण्याचेही असते. मतदार आज केवळ घोषणांपेक्षा स्थैर्य, नेतृत्व क्षमता आणि स्पष्ट राजकीय दिशा यांना अधिक महत्त्व देतात. त्यामुळे कोणत्याही पक्षासाठी अंतर्गत संवाद, मतभेदांचे व्यवस्थापन आणि कार्यकर्त्यांचा विश्वास कायम ठेवणे हे तितकेच महत्त्वाचे असते, जितके निवडणूक प्रचार. आघाडीसाठीही हेच तत्त्व लागू होते. विरोधी एकजूट ही केवळ बैठका आणि संयुक्त निवेदनांमधून सिद्ध होत नाही. त्यामुळे आघाडीतील प्रत्येक पक्षाने संघटनात्मक क्षमता मजबूत ठेवणे आवश्यक आहे. अन्यथा राष्ट्रीय स्तरावरील एकतेचा संदेश मतदारांपर्यंत पोहोचविणे कठीण होऊ शकते. दिल्लीतील बैठक आणि तृणमूल काँग्रेस संदर्भातील चर्चा या दोन्ही घटना भारतीय लोकशाहीतील एका वास्तवाची आठवण करून देतात. सत्ताधारी पक्षाला पर्याय उभा करण्यासाठी विरोधी पक्षांनी एकत्र येणे पुरेसे नसते; तर त्या एकतेला संघटनात्मक स्थैर्य, स्पष्ट नेतृत्व आणि सातत्यपूर्ण राजकीय दृष्टीकोनाची जोड द्यावी लागते. तृणमूल काँग्रेससमोरील सध्याची आव्हाने किती गंभीर आहेत, याचे स्पष्ट चित्र पुढील काळात समोर येईल. मात्र, या घडामोडी विरोधी पक्षांच्या संघटनात्मक क्षमतेची आणि एकजुटीची महत्त्वपूर्ण परीक्षा ठरत आहेत, एवढे मात्र निश्चित.

### फुगेवाडी दारूकांडानंतर पोलिस आयुक्तालयाचा कडक निर्णय

# वरिष्ठ अधिकाऱ्यांनी हद्दीतच वास्तव्यास रहावे

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी :** फुगेवाडी विषारी दारूकांडानंतर पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयाने प्रशासकीय शिस्त अधिक कडक करण्यास सुरुवात केली आहे. अवैध धंद्यांकडे झालेल्या दुर्लक्षामुळे निर्माण झालेल्या गंभीर परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पोलिस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करण्यासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. त्यानुसार सर्व पोलिस उपायुक्त, सहाय्यक पोलिस आयुक्त, पोलिस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी आणि विविध शाखांचे प्रमुख यांनी आपल्या कार्यक्षेत्रातच वास्तव्यास राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

यासंदर्भात पोलिस आयुक्तालयाने परिपत्रक जारी केले असून वाढते शहरीकरण, बदलते गुन्हेगारी स्वरूप, कायदा व सुव्यवस्था, वाहतूक कोंडी, महिला व बालकांवरील अत्याचार, अवैध व्यवसाय, खंडणी, दरोडे आणि सराईत गुन्हेगारांवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांची स्थानिक उपस्थिती आवश्यक असल्याचे नमूद करण्यात आले आहे. परिपत्रकानुसार कोणतीही गंभीर घटना घडल्यास संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी पोहोचणे, परिस्थितीचा आढावा घेणे, वरिष्ठांना नियमित माहिती देणे आणि कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणे अपेक्षित आहे.

फुगेवाडी विषारी दारूकांडानंतर स्थानिक पोलिसांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले होते. या प्रकरणात काही अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाईही करण्यात आली. त्यानंतर पोलिस आयुक्त चौबे यांनी संपूर्ण यंत्रणा अधिक उत्तरदायी करण्यासाठी विविध उपाययोजना सुरू केल्या आहेत. दोन दिवसांपूर्वी प्रत्येक पोलिस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याने आपल्या हद्दीत कोणताही अवैध व्यवसाय सुरू नसल्याचे प्रमाणपत्र सादर करण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर आता कार्यक्षेत्रात वास्तव्यास राहण्याचा निर्णय घेतल्याने आयुक्तालयाने शिस्त आणि जबाबदारीबाबत गंभीर भूमिका घेतल्याचे स्पष्ट झाले आहे.

या निर्णयामुळे गंभीर घटना, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न किंवा मोठ्या गुन्ह्याच्या वेळी वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी अधिक वेगाने पोहोचू शकतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. त्यामुळे पोलिसांचा प्रतिसादाचा कालावधी कमी होऊन नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने सकारात्मक परिणाम होण्याची शक्यता आहे. आयुक्तालयाकडून आगामी काळात अवैध धंदे, हातभट्टी, अमली पदार्थांची तस्करी, मटका, जुगार आणि संघटित गुन्हेगारीविरोधातील कारवायांचे नियमित मूल्यमापन केले जाणार आहे. त्यामुळे पोलिस ठाणे आणि शाखा स्तरावरील अधिकाऱ्यांची जबाबदारी आणखी वाढणार असल्याचे बोलले जात आहे.


नव्या आदेशानुसार पोलिस उपायुक्त, सहाय्यक पोलिस आयुक्त, पोलिस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी आणि विविध शाखांचे प्रभारी अधिकारी यांना आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात वास्तव्यास राहणे बंधनकारक करण्यात आले आहे. यापूर्वी काही अधिकारी कार्यक्षेत्राबाहेर राहत होते. मात्र आता वरिष्ठ स्तरापासून पोलिस ठाणे प्रमुखांपर्यंत सर्व संबंधित अधिकाऱ्यांना हा नियम लागू करण्यात आला आहे.

मुलांचे शिक्षण, स्वतःचे घर, जोडीदाराची नोकरी, ज्येष्ठ पालकांची जबाबदारी तसेच पुणे परिसरातील दीर्घकालीन वास्तव्य यांसारख्या कारणांमुळे काही अधिकारी कार्यक्षेत्राबाहेर राहत होते. याशिवाय चांगल्या निवासी सुविधा, शैक्षणिक संस्था, आरोग्य सेवा आणि अन्य नागरी सोयीसुविधांमुळेही अनेक अधिकाऱ्यांनी बाहेरील परिसरात निवास कायम ठेवला होता. बदलीनंतरही काही अधिकारी जुन्या निवासस्थानावरूनच ये-जा करत असल्याचे चित्र होते. मात्र नव्या आदेशामुळे अशा पद्धतीला आळा बसणार आहे.

# लोण्यावळ्याला प्रतीक्षा मान्सूनच्या सरींची

### उष्णतेने नागरिक, पर्यटक आणि शेतकरी हैराण

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**लोणावळा :** पावसाळी पर्यटनासाठी जगप्रसिद्ध असलेल्या लोणावळा शहराला यंदा मान्सूनच्या आगमनाची प्रतीक्षा लागली आहे. मागील वर्षी मे महिन्यातच मान्सूनचे आगमन झाले होते आणि १७ जून रोजी प्रसिद्ध भुशी धरण ओव्हरफ्लो झाले होते. गेल्या काही वर्षांचा आढावा घेतल्यास जूनअखेरपर्यंत भुशी धरण भरून वाहण्यास सुरुवात होत असल्याने पावसाळी पर्यटन हंगामाला वेग येतो. मात्र यंदा जूनचा पहिला आठवडा संपत आला तरी मान्सूनने अद्याप लोणावळा आणि मावळ परिसरात हजेरी लावलेली नाही.

यावर्षी अवकाळी पावसाचे प्रमाणही तुलनेने कमी राहिले आहे. त्यातच उन्हाची तीव्रता वाढल्याने नागरिक उष्णतेने हैराण झाले आहेत. केरळमध्ये मे अखेरीस दाखल झालेला मान्सून आठवडाभरात महाराष्ट्रात सक्रिय होईल, असा अंदाज व्यक्त करण्यात आला होता. मात्र मान्सूनच्या प्रगतीला विलंब झाल्याने घाटमाथ्यासह लोणावळा परिसरात अद्याप पावसाची जोरदार सुरुवात झालेली नाही.

लोणावळा, खंडाळा आणि मावळ तालुका हे पावसाळी पर्यटनासाठी देशभर प्रसिद्ध आहेत. मान्सून हंगामासाठी स्थानिक व्यावसायिकांनी तयारी पूर्ण केली असली तरी पावसाअभावी पर्यटन व्यवसायावर परिणाम होत आहे. उन्हाळी सुट्ट्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर पर्यटक लोणावळा आणि खंडाळ्यात दाखल झाले असले, तरी वाढत्या उष्णतेमुळे त्यांचा अपेक्षित आनंद हिरावला गेला आहे. दिवसभर उन्हाचा कडाका असल्याने अनेक पर्यटक हॉटेल्स, रिसॉर्ट्स आणि वाहनांमध्येच राहणे पसंत करत आहेत. मात्र सकाळी आणि सायंकाळी पर्यटनस्थळांवर गर्दी होत असल्याचे चित्र आहे.

भुशी धरण, टायगर पॉइंट, सहारा पुलाजवळील धबधबे, पवना धरण, भाजे धबधबा, लोहगड किल्ला, कार्ला लेणी तसेच आंदर मावळ परिसरातील निसर्गसौंदर्य अनुभवण्यासाठी पर्यटक उत्सुक आहेत. मात्र पावसाअभावी धबधबे सुरू झाले नसल्याने पर्यटकांचा काहीसा हिरमोड होत आहे.

मावळ तालुक्यातील शेतकऱ्यांनाही मान्सूनची प्रतीक्षा लागली आहे. भात शेतीसाठी प्रसिद्ध असलेल्या या भागात पावसाळ्यात मोठ्या प्रमाणावर भात लागवड केली जाते. काही ठिकाणी पाण्याची उपलब्धता असल्याने शेतकऱ्यांनी भात रोपवाटिका तयार केल्या आहेत, तर काही भागांत पेरणीही करण्यात आली आहे. मात्र पाऊस न झाल्याने रोपांची उगवण अपेक्षित प्रमाणात झालेली नाही.

पर्यटक, व्यावसायिक आणि शेतकरी अशा सर्व घटकांचे लक्ष आता मान्सूनच्या आगमनाकडे लागले असून पावसाच्या प्रतीक्षेत संपूर्ण मावळ परिसर आहे.

# पिंपरी-चिंचवडकर हैराण पावसाच्या प्रतीक्षेत नागरिक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहरात वाढत्या उकाड्याने नागरिकांचे जगणे त्रस्त झाले असून जून महिना सुरू होऊनही उन्हाची तीव्रता कायम आहे. जूनमध्ये तापमानात घट होऊन दिलासा मिळेल, अशी अपेक्षा असताना दमट वातावरण आणि कडक उन्हामुळे नागरिक घामाघूम होत आहेत.

यंदा मान्सूनचे आगमन लांबल्याने जून महिन्यातही उष्णतेचा प्रभाव कायम राहणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. शहरातील तापमान ३५ ते ३६ अंश सेल्सिअसच्या आसपास असले तरी प्रत्यक्षात ४० अंशांहून अधिक उकाड्याचा अनुभव नागरिक घेत आहेत. रात्रीचे तापमानही तुलनेने जास्त असल्याने रात्रीदेखील घामाच्या धारांचा सामना करावा लागत आहे.

वाढत्या उष्णतेमुळे डिहायड्रेशन, त्वचारोग, चक्कर येणे, मळमळ आणि उलट्यांसारख्या आरोग्यविषयक तक्रारींमध्ये वाढ झाल्याचे दिसून येत आहे. दिवसभर वातानुकूलित कार्यालयांमध्ये काम केल्यानंतर अचानक बाहेरील उष्ण वातावरणात वावरल्याने अनेकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असल्याचे वैद्यकीय तज्ज्ञ सांगत आहेत.

उन्हात कामानिमित्त बाहेर पडणारे नागरिक आणि मैदानी काम करणाऱ्या कामगारांचे विशेष हाल होत आहेत. त्यामुळे टोपी, गॉगल, सनप्रूफ जॅकेट, स्कार्फ, मास्क, हातमोजे आणि छत्री यांचा वापर वाढला आहे. दुपारच्या वेळेत शहरातील प्रमुख चौक, बाजारपेठा आणि भाजी मंडईतही वर्दळ कमी झाल्याचे चित्र दिसून येत आहे. अनेक नागरिक सायंकाळी ऊन कमी झाल्यानंतरच खरेदीसाठी घराबाहेर पडत आहेत.

# अल्पवयीन मुलीवर अत्याचार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** बारा वर्षीय मुलीचे अश्लील फोटो व्हायरल करून तिचा विनयभंग करण्यात आला. तसेच, आणखी फोटो व्हायरल करण्याची धमकी देत तिच्यावर लैंगिक अत्याचार करण्यात आला. तळेगाव दाभाडे येथे हा धक्कादायक प्रकार घडला.

विपुल विश्वकर्मा (१९, रा. वराळे, ता. मावळ, जि. पुणे), कोझी कॅफेचे चालक यांच्यासह एका १७ वर्षीय मुलाच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पीडित १२ वर्षीय मुलीच्या आईने याप्रकरणी ३ जून रोजी तळेगाव दाभाडे पोलिस ठाण्यात फिर्याद दिली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी मुलाने पीडित १२ वर्षीय मुलीसोबत मैत्री केली. त्यानंतर जानेवारी ते फेब्रुवारी २०२६ दरम्यान अल्पवयीन मुलाने विविध प्रकारे धमकावले. तुझी बदनामी करेन, तुला तोंड दाखवायला जागा ठेवणार नाही, अशी धमकी देऊन पीडितेकडून काही खासगी माहिती आणि फोटो सोशल मीडियावरून मिळवले. त्यानंतर हे फोटो समाजमाध्यमांवर प्रसारित करून पीडितेचा विनयभंग केला. दरम्यान, अल्पवयीन मुलाने फोटो सर्वांना पाठवण्याची धमकी पीडितेला दिली. त्याआधारे तिला धमकावत तिच्यावर लैंगिक अत्याचार केले. कॅफेचालकाने अशा प्रकारांसाठी जागा उपलब्ध करून दिल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे. त्यामुळे याप्रकरणी कॅफेचालक आणि इतर दोघांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# पिंपरी भाजी मंडईत भाजीपाल्याचे दर स्थिर

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी :** येथील लालबहादूर शास्त्री भाजी मंडईत रविवारी फळभाज्यांचे दर गेल्या आठवड्याप्रमाणे स्थिर राहिले. मात्र पालेभाज्यांची आवक घटल्याने त्यांच्या दरात वाढ झाली असून कोथिंबीर, मेथीसह विविध पालेभाज्या प्रति जुडी ३० ते ५० रुपयांनी विक्री होत आहेत.

बिन्स, पावटा आणि घेवडा यांच्या किमती तेजीत कायम असून गवार आणि शेवगा यांच्या दरात काहीशी घसरण झाली आहे. कोथिंबीर आणि मेथीच्या जुड्या ३० ते ४० रुपयांना विकल्या जात आहेत. गवार व शेवगा ५० ते ६० रुपये प्रतिकिलो दराने उपलब्ध आहेत. वांगी आणि फ्लॉवरचा दर ४० ते ५० रुपये प्रतिकिलो असून हिरवी मिरची ५० रुपये किलोने विक्री होत आहे. कांदे पाच किलोसाठी १०० रुपये दराने उपलब्ध आहेत. लसूण १०० ते १५० रुपये तर आले ८० ते ९० रुपये प्रतिकिलो दराने विकले जात आहे.

रविवारच्या किरकोळ बाजारात गवार ७० रुपये, शेवगा ७० रुपये, टोमॅटो २५ रुपये, भेंडी ७० रुपये, फ्लॉवर ५० रुपये, कोबी ३० रुपये, मिरची ५० रुपये, गाजर ३० रुपये, ढोबळी मिरची ८० रुपये, वांगी ७० रुपये, काकडी ४० रुपये, कारले ८० रुपये, बटाटा २५ ते ३० रुपये, बिन्स १०० रुपये, पावटा १०० रुपये, लाल भोपळा ४० रुपये, घोसाळी ५० रुपये, दोडका ७० रुपये, तोंडली ५० रुपये, बीट ४० रुपये, दुधी भोपळा ५० रुपये आणि घेवडा १०० रुपये प्रतिकिलो दराने विक्री झाला.

पालेभाज्यांमध्ये कोथिंबीर ३० रुपये, मेथी ३० ते ४० रुपये, पालक ३० रुपये, शेपू ३० रुपये, राजगिरा ३० रुपये, पुदिना १० रुपये, मुळा ४० रुपये, चवळई ३० रुपये, लाल माठ ३० रुपये, कांदापात ५० ते ६० रुपये, करडई २० रुपये, आळू पाने १५ रुपये आणि चुका ३० रुपये प्रति जुडी दराने विक्री होत होती.

मोशी उपबाजारातील घाऊक बाजारात कांदा १० रुपये, बटाटा १२ रुपये, लसूण १०० रुपये, आले ७० रुपये, भेंडी ३५ रुपये, गवार ३५ रुपये, टोमॅटो २५ रुपये, घेवडा ८० रुपये, दोडका ३५ रुपये, हिरवी मिरची ५५ रुपये, दुधी भोपळा ३० रुपये, काकडी २५ रुपये, कारले ३५ रुपये, गाजर २५ रुपये, फ्लॉवर २० रुपये, कोबी १५ रुपये, ढोबळी मिरची ३५ रुपये, वांगी २५ रुपये, शेवगा ३५ रुपये, घोसाळी ३० रुपये, लिंबू ५० रुपये आणि मका कणीस ५० रुपये प्रतिकिलो दराने विक्री झाले.

मोशी उपबाजारात फळभाजीची ५,३५९ क्विंटल, कांद्याची ७७७ क्विंटल, बटाट्याची १,५१४ क्विंटल तर पालेभाज्यांच्या ४९ हजार गड्ड्यांची आवक झाली. टोमॅटो, फ्लॉवर, कोबी, काकडी, वांगी, हिरवी मिरची आणि इतर भाजीपाल्याचीही मोठ्या प्रमाणात आवक झाल्याने बाजारातील दर सर्वसाधारणपणे स्थिर राहिल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले.

# घरगुती गॅसचे अवैध रिफिलिंग; भोसरीत एकावर गुन्हा

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**भोसरी :** घरगुती एलपीजी गॅस सिलिंडरमधील गॅस लहान सिलिंडरमध्ये भरून त्याचा अवैध साठा केल्याप्रकरणी एका व्यक्तीविरुद्ध भोसरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईत गॅस हस्तांतरणासाठी वापरले जाणारे साहित्य आणि सुमारे ८ हजार ८०० रुपयांचा गॅस साठा जप्त करण्यात आला.

पोलिस शिपाई राहुल बाबाजी डेरे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून बसवराज श्रीशैल तोरणगी (वय २१) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ७ जून रोजी दुपारी गव्हाणेवस्ती भाजी मंडई परिसरात ही कारवाई करण्यात आली. आरोपी घरगुती वापरासाठी असलेल्या एलपीजी सिलिंडरमधील गॅस कोणतीही सुरक्षा उपाययोजना न करता लहान लोखंडी सिलिंडरमध्ये भरत असल्याचे आढळून आले.

या प्रकारामुळे परिसरातील नागरिकांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. छाप्यामध्ये गॅस ट्रान्सफर करण्यासाठी वापरण्यात येणारे साहित्य तसेच अवैधरीत्या साठवून ठेवलेला गॅस जप्त करण्यात आला. तपासादरम्यान आरोपीकडे या व्यवसायासाठी आवश्यक परवाना नसल्याचेही उघड झाले. याप्रकरणी भोसरी पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या कलम २८७, २८८ तसेच जीवनावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ अंतर्गत गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

**गॅसचे बेकायदा रिफिलिंग**

**भोसरी :** घरगुती एलपीजी गॅस सिलिंडरमधील गॅस बेकायदेशीरपणे लहान सिलिंडरमध्ये भरून विक्रीसाठी साठा केल्याप्रकरणी भोसरी पोलिसांनी कारवाई करत एकाला अटक केली आहे. या कारवाईत गॅस सिलिंडर आणि संबंधित साहित्य असा एकूण १२ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

याप्रकरणी भोसरी पोलिस ठाण्यात गुन्हा क्रमांक २२९/२०२६ दाखल करण्यात आला आहे. भारतीय न्याय संहिता कलम २८७, २८८, अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५ मधील कलम ३ व ७ तसेच स्फोटक पदार्थ अधिनियम १९०८ मधील कलम ५ अन्वये कारवाई करण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ७ जून रोजी सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास चक्रपाणी रोडवरील जय श्रीराम गॅस सर्व्हिस परिसरात छापा टाकण्यात आला. या कारवाईत अक्षय प्रभाकर कांबळे (वय २०) आणि अजय चिंचोळे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून अक्षय कांबळे याला अटक करण्यात आली आहे.

आरोपी घरगुती वापरासाठी असलेल्या एलपीजी सिलिंडरमधील गॅस कोणतीही सुरक्षा उपाययोजना न करता लहान सिलिंडरमध्ये भरत असल्याचे तपासात निष्पन्न झाले. जीवितास धोका निर्माण होईल अशा पद्धतीने गॅसचे हस्तांतरण करून त्याचा विक्रीसाठी साठा करण्यात आल्याचा आरोप पोलिसांनी केला आहे. पुढील तपास भोसरी पोलिस करीत आहेत.

**अवैध दारू वाहतूक उघड**

**पिंपरी :** चिंचवड परिसरात अवैध दारूची वाहतूक करणाऱ्या व्यक्तीविरुद्ध पोलिसांनी कारवाई करत दारूसह दुचाकी जप्त केली. याप्रकरणी चिंचवड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीचा शोध सुरू आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ७ जून २०२६ रोजी दुपारी साडेदोनच्या सुमारास लिंक रोडवरील आर्किड इंटरनॅशनल स्कूलसमोर ही कारवाई करण्यात आली. रामकृष्णन चतुर पासवान (वय ३३) याच्याविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्याच्या कलम ६५(ई) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी सापळा रचून कारवाई केली. यावेळी आरोपीकडून सुमारे २ हजार ४०० रुपयांची अवैध दारू आणि सुमारे ८० हजार रुपये किमतीची ॲक्टिव्हा दुचाकी जप्त करण्यात आली. सुमारे ८२ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांच्या ताब्यात घेण्यात आला. या प्रकरणी चिंचवड पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

# बावधन परिसरात गुटखा विक्रीवर कारवाई

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेल्या गुटखा व सुगंधी तंबाखूजन्य पदार्थांची बेकायदेशीर विक्री करणाऱ्या पानटपरीवर बावधन पोलिसांनी छापा टाकून कारवाई केली. या प्रकरणी पानटपरी चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून प्रतिबंधित माल जप्त करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ७ जून २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ७ वाजण्याच्या सुमारास घोटावडे फाटा परिसरातील उरवडे रोडलगत असलेल्या राऊत पान शॉपवर छापा टाकण्यात आला. कारवाईदरम्यान शासनाने बंदी घातलेला सुगंधी तंबाखूजन्य पदार्थ, सुगंधी सुपारी आणि गुटखा असा सुमारे १ हजार ८५३ रुपयांचा माल जप्त करण्यात आला.

याप्रकरणी पोलिस शिपाई अमोल आत्माराम बुरटे यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार भरत दगडू राऊत (वय २८, रा. वातुंडे, ता. मुळशी) याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीने प्रतिबंधित माल पिरंगुट येथील एका व्यापाऱ्याकडून आणल्याची माहिती दिल्याचे पोलिसांनी सांगितले. या साखळीत आणखी कोणी सहभागी आहे का, याचा तपास केला जात आहे. बावधन पोलिस पुढील तपास करीत आहेत.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अ‍ॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### शिरूर तालुक्यात शेतकऱ्याची हत्या

**पुणे :** शिरूर तालुक्यातील वरुडे गावात ५५ वर्षीय शेतकऱ्याची गळा चिरून हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना रविवारी मध्यरात्री उघडकीस आली. बाळासाहेब बबन तांबे असे मृत शेतकऱ्याचे नाव असून या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, बाळासाहेब तांबे हे शेती व्यवसाय करत होते. रविवारी रात्री जेवण आटोपल्यानंतर उन्हाळ्याच्या उकाड्यामुळे ते नेहमीप्रमाणे घराच्या अंगणात झोपले होते. मध्यरात्रीच्या सुमारास अज्ञात व्यक्तींनी त्यांच्यावर धारदार शस्त्राने हल्ला केल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. सोमवारी सकाळी ही घटना उघडकीस आल्यानंतर परिसरात एकच खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. हत्येमागील कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पोलिस विविध अंगांनी तपास करीत आहेत.

### जुन्या वादातून तरुणावर हल्ला

**लोणी काळभोर :** जुन्या वादाचा राग मनात धरून एका तरुणावर धारदार शस्त्राने जीवघेणा हल्ला केल्याची घटना मांजरी बुद्रुक परिसरात घडली. या हल्ल्यात दोन तरुण गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर ससून सर्वोपचार रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याप्रकरणी मांजरी पोलिसांनी आरोपींसह त्यांच्या साथीदारांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. विशाल हनुमंत सोनवणे (वय २४, रा. कुंजीरवस्ती, मांजरी बुद्रुक) यांनी याबाबत फिर्याद दिली आहे. त्यानुसार प्रेम परकाळे, धैर्यशील आखाडे आणि त्यांच्या साथीदारांविरोधात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. माहितीनुसार, विशाल सोनवणे हे शनिवारी रात्री त्यांचा मित्र यश भगत हे दुचाकीत पेट्रोल भरण्यासाठी समर्थ पेट्रोल पंपावर गेले होते. तेथे आरोपी आणि त्यांचे साथीदार आले. यावेळी तू आदित्य मुसळेसोबत भांडण का केले, असा जाब विचारत त्यांनी विशाल सोनवणे यांच्याशी वाद घातला.

### विनापरवाना व्यवसायांवर वाढला दबाव

# तुकाराम मुंढे यांच्या कारवाईची धास्ती

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**ओतूर :** अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या राज्यभर सुरू असलेल्या कारवाईचा परिणाम आता ग्रामीण भागातही दिसून येत आहे. विविध ठिकाणी विनापरवाना व्यवसायांवर कारवाईची शक्यता निर्माण झाल्याने अनेक दुकाने बंद ठेवण्यात आल्याचे चित्र दिसत असून याबाबत नागरिकांमध्ये चर्चांना उधाण आले आहे.

गेल्या काही दिवसांपासून अन्न सुरक्षा, भेसळयुक्त पदार्थ आणि विनापरवाना व्यवसायांविरोधात प्रशासनाने मोहीम सुरू केली आहे. त्यानंतर ग्रामीण भागातील काही किराणा दुकाने, खाद्यपदार्थ विक्री केंद्रे तसेच गुटखा विक्री करणाऱ्या टपऱ्या बंद असल्याचे आढळून आले. त्यामुळे अनेक व्यवसायिकांमध्ये धास्तीचे वातावरण निर्माण झाले आहे.

दरम्यान, बहुतांश व्यावसायिकांनी आवश्यक परवाने घेऊन कायदेशीर चौकटीत व्यवसाय सुरू ठेवला असल्याचेही दिसून येत आहे. मात्र काही ठिकाणी नियमांचे पालन न करता व्यवसाय सुरू असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून केल्या जात आहेत.

नागरिकांच्या दैनंदिन गरजांशी संबंधित असलेल्या किराणा व्यवसायात भेसळ आणि निकृष्ट दर्जाच्या वस्तूंच्या विक्रीच्या घटना यापूर्वी उघडकीस आल्या आहेत. त्यामुळे अन्न सुरक्षा नियमांचे काटेकोर पालन होणे आवश्यक असल्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

जुन्नर तालुक्यातील काही आठवडे बाजारांमध्ये उघड्यावर किराणा माल, खाद्यतेल, मसाले आणि इतर खाद्यपदार्थांची विक्री होत असल्याचे निदर्शनास येत आहे. या व्यवसायांमध्ये आवश्यक परवाने आणि अन्न सुरक्षा नियमांचे पालन होत आहे का, याची तपासणी करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

ज्यूस सेंटर, रसवंतीगृहे, बेकरी, आईस्क्रीम विक्री व उत्पादन केंद्रे यांचीही नियमित तपासणी होणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले जात आहे. नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित बाबींमध्ये कोणतीही तडजोड होऊ नये, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

प्रशासनाच्या कारवाईनंतर अनेक व्यावसायिकांनी नव्याने व्यवसाय परवाने मिळविण्यासाठी प्रयत्न सुरू केल्याची माहिती समोर येत आहे. नियमांचे पालन करणाऱ्या व्यावसायिकांना प्रोत्साहन देतानाच विनापरवाना व्यवसाय करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी काही नागरिकांनी केली आहे. काही नागरिकांनी संबंधित विभागांच्या कार्यपद्धतीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. अनेक वर्षे नियमबाह्य व्यवसाय सुरू असताना त्यांच्यावर प्रभावी कारवाई का झाली नाही, याची चौकशी व्हावी, अशी मागणी करण्यात येत आहे. मात्र या आरोपांबाबत संबंधित विभाग किंवा अधिकाऱ्यांची अधिकृत प्रतिक्रिया अद्याप समोर आलेली नाही.

दरम्यान, तुकाराम मुंढे यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या कारवाईमुळे अन्न सुरक्षा आणि व्यवसाय परवान्यांबाबत जागरूकता वाढल्याचे चित्र ग्रामीण भागात पाहायला मिळत आहे.

## शिवराज्याभिषेक सोहळा दिन सणसर सोसायटीत उत्साहात



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**भवानीनगर :** सणसर विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून शिवराज्याभिषेक सोहळा दिन उत्साहात साजरा करण्यात आला, अशी माहिती संस्थेच्या अध्यक्षा सीमा विक्रम निंबाळकर यांनी दिली.

यावेळी सोसायटीने मागील दीड महिन्यांत थकीत कर्जाची एक कोटी रुपयांहून अधिक रकमेची यशस्वी वसुली केल्याबद्दल सोसायटीचे सचिव संजय सपकळ आणि कर्मचारी तुषार निंबाळकर यांचा सत्कार करण्यात आला. अध्यक्ष सीमा निंबाळकर, उपाध्यक्ष आणि संचालक मंडळाच्या वतीने हा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमास विक्रम निंबाळकर, तानाजी जाधव, परशुराम रायते, सोमनाथ जगताप, राहुल काळे, सचिन फुले, सुशील निंबाळकर, सोमनाथ गुप्ते, औदुंबर निंबाळकर, रमेश निंबाळकर, किसन नलवडे, जगदीश कांबळे यांच्यासह संचालक, सभासद आणि कर्मचारी उपस्थित होते.

## मुले घेताहेत पोहण्याचा आनंद

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पारगाव :** आंबेगाव तालुक्यात यंदा उन्हाळ्याची तीव्रता लक्षणीय वाढली असून जून महिन्याचा पहिला आठवडा संपल्यानंतरही उन्हाचा तडाखा कायम आहे. फेब्रुवारीपासूनच उन्हाच्या झळा जाणवू लागल्या होत्या. त्यानंतर मार्च, एप्रिल आणि मे महिन्यात नागरिकांना कडाक्याच्या उष्णतेचा सामना करावा लागला. जून महिन्यातही तापमानात अपेक्षित घट होत नसल्याने नागरिक हैराण झाले आहेत.

वाढत्या उष्णतेमुळे दुपारच्या वेळी रस्ते आणि सार्वजनिक ठिकाणांवरील वर्दळ कमी झाल्याचे दिसून येत आहे. मात्र, तालुक्यातील अनेक गावांमधील शेततळी सध्या लहान मुले आणि तरुणांसाठी आकर्षणाचे केंद्र ठरत आहेत. दुपारच्या वेळेत शाळकरी मुले आणि युवक शेततळ्यांमध्ये पोहण्याचा आनंद घेताना दिसत आहेत.

शेतकऱ्यांनी पाणी साठवणूक आणि शेतीसाठी वर्षभर पाण्याची उपलब्धता राहावी या उद्देशाने शेततळी उभारली आहेत. अनेक शेततळ्यांमध्ये विहिरी आणि बोअरवेलमधून पाणी सोडण्यात आल्याने ती सध्या तुडुंब भरलेली आहेत. या पाण्याचा वापर ऊस, भाजीपाला, फळबागा तसेच अन्य पिकांसाठी होत असून शेतीला मोठा आधार मिळत आहे.

उन्हाचा कडाका वाढल्यानंतर दुपारच्या वेळेत लहान मुले आणि तरुण शेततळ्यांकडे वळत आहेत. थंडगार पाण्यात पोहताना आणि जलक्रीडेचा आनंद घेताना युवक अनेक ठिकाणी दिसून येत आहेत. त्यामुळे उष्णतेपासून काहीसा दिलासा मिळत असल्याची भावना युवकांमधून व्यक्त होत आहे.

दरम्यान, शेततळ्यांमध्ये पोहताना सुरक्षिततेची काळजी घेण्याची गरज व्यक्त केली जात आहे. खोल पाण्यात उतरताना खबरदारी घेणे, एकट्याने पोहणे टाळणे तसेच पालकांनी मुलांवर लक्ष ठेवणे आवश्यक असल्याचे ज्येष्ठ नागरिकांनी सांगितले. शेतीसाठी वरदान ठरलेली शेततळी सध्या वाढत्या उष्णतेत नागरिकांना थंडावा देण्याचे कामही करत असल्याचे चित्र आंबेगाव तालुक्यात पाहायला मिळत आहे.

दुपारच्या वेळेत अनेक ठिकाणी लहान मुले व तरुण पोहण्यासाठी गर्दी करत असून ग्रामीण भागात शेततळी ही उन्हाळ्यातील आकर्षणाची ठिकाणे बनली आहेत.

## पुणे-नाशिक रेल्वेमार्गाला गती देण्याची मागणी

### ग्रामीण विकासासाठी प्रकल्प महत्त्वाचा

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** पुणे-मंचरमार्गे नाशिक रेल्वेमार्ग हा केवळ वाहतूक सुविधा वाढविणारा प्रकल्प नसून संपूर्ण परिसराच्या आर्थिक आणि औद्योगिक विकासाला चालना देणारा महत्त्वाकांक्षी उपक्रम मानला जात आहे. या रेल्वेमार्गामुळे स्थानिक शेतीमालाला पुणे, मुंबई आणि नाशिकसारख्या मोठ्या बाजारपेठांपर्यंत जलद आणि किफायतशीर वाहतूक उपलब्ध होणार आहे.

या प्रकल्पामुळे पर्यटन क्षेत्रालाही मोठी चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. ग्रामीण भागाचा थेट संपर्क महानगरांशी प्रस्थापित होणार असल्याने प्रवासाचा वेळ आणि खर्च दोन्ही कमी होणार आहेत. पुणे, नाशिक आणि मुंबई या आर्थिकदृष्ट्या महत्त्वाच्या त्रिकोणातील व्यापार, उद्योग आणि अन्य व्यवहार अधिक सुलभ होण्यास मदत होणार आहे. परिणामी, ग्रामीण भागात रोजगारनिर्मिती, उद्योगविकास आणि शेतीपूरक व्यवसायांना मोठी संधी उपलब्ध होऊ शकते. अशा परिस्थितीत केवळ तांत्रिक अडचणी किंवा भीतीमुळे हा प्रकल्प रखडविणे अथवा थांबविणे योग्य ठरणार नसल्याची भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे. हा प्रकल्प विलंबित झाल्यास लाखो नागरिकांच्या विकासाच्या संधींवर परिणाम होईल, असा आरोपही काही नागरिकांनी केला आहे.

केंद्र आणि राज्य सरकारने विकासाशी संबंधित निर्णय घेताना व्यापक लोकहिताला प्राधान्य देणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले जात आहे. काही मोजक्या घटकांच्या दबावापेक्षा सर्वसामान्य जनतेच्या दीर्घकालीन हिताचा विचार करून प्रकल्पाला गती देण्याची गरज असल्याचे सांगितले जात आहे.

प्रगतीचा वेग वाढवायचा असेल आणि ग्रामीण भागाचा सर्वांगीण कायापालट घडवून आणायचा असेल, तर खेड, आंबेगाव आणि जुन्नरसारख्या व्यापारीदृष्ट्या महत्त्वाच्या तालुक्यांमधून रेल्वेमार्ग जाणे आवश्यक असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. सरकारने विलंब न करता ठोस निर्णय घेऊन प्रकल्प मार्गी लावावा, अशी मागणी होत आहे. विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या या रेल्वेमार्गाला तातडीने गती देण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारने समन्वयाने पावले उचलावीत, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत.

## पुनर्वसनाच्या संपादित जमिनींवर डोळा?

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**लोणी-धामणी :** आंबेगाव तालुक्यात पुनर्वसन विभागाच्या संपादित जमिनींच्या वाटप प्रक्रियेत अनियमितता होत असल्याचा आरोप पुढे आला आहे. एकाच पात्र व्यक्तीला दोन वेगवेगळ्या गावांमध्ये जमिनींचे वाटप होत असल्याचे प्रकार पोंदेवाडी आणि लाखणगाव परिसरात समोर येत असल्याचा दावा आंबेगाव तालुका खरेदी-विक्री संघाचे माजी अध्यक्ष अनिल वाळुंज यांनी केला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी महसूल व पुनर्वसन विभागाकडे केली आहे.

पुनर्वसनासाठी राखीव असलेल्या जमिनींच्या वाटपात नियमांचे उल्लंघन होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. एकाच प्रकल्पग्रस्त अथवा पात्र व्यक्तीला दोन वेगवेगळ्या गावांमध्ये जमीन देण्यात येत असल्याने खऱ्या लाभार्थ्यांवर अन्याय होत असून काही दलाल आर्थिक लाभ घेत असल्याचे वाळुंज यांनी म्हटले आहे.

संपादित जमिनींच्या व्यवहारांमध्ये दलालांचा हस्तक्षेप वाढल्याचेही त्यांनी निदर्शनास आणले आहे. जमीन वाटपाची प्रक्रिया पूर्ण होऊन अधिकृत फेरफार नोंदी होण्यापूर्वीच काही एजंट आणि दलालांकडून जमिनींची खरेदी-विक्री केली जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. कागदपत्रांतील त्रुटी आणि प्रशासकीय गोंधळाचा गैरफायदा घेत बनावट कागदपत्रे तयार केली जात असल्याचाही दावा करण्यात आला आहे.

या प्रकरणाची तातडीने चौकशी करून जिल्हा पुनर्वसन कार्यालय तसेच संबंधित विभागांच्या अभिलेखांची तपासणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच चुकीच्या पद्धतीने वाटप झालेल्या जमिनींचे फेरफार रद्द करून संबंधित दोषींवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी अनिल वाळुंज यांनी केली आहे.

दरम्यान, या आरोपांबाबत संबंधित महसूल व पुनर्वसन विभागाकडून अधिकृत प्रतिक्रिया मिळू शकलेली नाही. चौकशीनंतरच वस्तुस्थिती स्पष्ट होणार आहे.

## वाकलेले वीजखांब धोकादायक तातडीने दुरुस्त करण्याची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पारगाव :** येथील घोडनदीलगत असलेले महावितरणचे तीन ते चार विद्युत वाहक खांब एका बाजूला मोठ्या प्रमाणात खचल्याने धोकादायक बनले आहेत. अलीकडे झालेल्या अवकाळी पाऊस आणि चक्रीवादळामुळे या खांबांची स्थिती अधिक गंभीर झाली असून ते कधीही कोसळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

माजी उपसरपंच विठ्ठल सिताराम ढोबळे यांनी याबाबत महावितरण कंपनीकडे निवेदन देऊन सदर खांबांची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी केली आहे. हे वीजखांब शेतकऱ्यांच्या शेतातून जात असून परिसरात मोठ्या प्रमाणावर ऊस लागवड करण्यात आली आहे. सध्या ऊस पिके जोमात असल्याने वीजवाहिनीचा खांब कोसळल्यास शेतकऱ्यांच्या जीवितासह पिकांचेही मोठे नुकसान होऊ शकते.

शेतकरी अनिल बाबाजी ढोबळे यांच्यासह इतर ग्रामस्थांनीही प्रशासनाचे लक्ष या गंभीर समस्येकडे वेधले आहे. पावसाळा सुरू होण्यापूर्वीच या खांबांची दुरुस्ती करण्यात यावी, अन्यथा जोरदार वारे किंवा मुसळधार पावसामुळे मोठी दुर्घटना घडण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. ग्रामस्थांनी संभाव्य धोका लक्षात घेऊन महावितरणने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली आहे.

## वारकरी साहित्य परिषदेचा मेळावा उत्साहात

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**ओतूर :** जुन्नर तालुका वारकरी साहित्य परिषदेचा मेळावा मंगळवारी ओतूर येथे वारकरी साहित्य परिषदेचे अध्यक्ष ह.भ.प. गंगाराम महाराज डुंबरे यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

मेळाव्यास पुणे जिल्हा वारकरी साहित्य परिषदेचे अध्यक्ष ह.भ.प. भाऊसाहेब महाराज हांडे, अनंतराव गटकळ, दत्ता वाघ, प्रकाश नवले, तानाजी खराडे, शिवाजी बोडके, बाळासाहेब नवले, हरिभाऊ देवकर, अरुणजी कुऱ्हाडे, भरत तांबे यांच्यासह मोठ्या संख्येने वारकरी उपस्थित होते. यावेळी ह.भ.प. भाऊसाहेब महाराज हांडे यांनी पुणे जिल्हा वारकरी साहित्य परिषदेच्या कार्याचा आढावा घेत जुन्नर तालुका परिषद विविध उपक्रमांमुळे जिल्ह्यात अग्रेसर असल्याचे सांगितले.

अध्यक्षीय भाषणात ह.भ.प. गंगाराम महाराज डुंबरे यांनी ११ नोव्हेंबर २०११ रोजी जुन्नर तालुका वारकरी साहित्य परिषदेची स्थापना झाल्याची माहिती दिली. वारकऱ्यांच्या विविध प्रश्नांचे निराकरण, मानधन मिळवून देण्यासाठी पाठपुरावा, भागवत धर्माचा प्रचार-प्रसार, शालेय स्तरावर प्रवचनांचे आयोजन, गावोगावी स्वच्छता अभियान तसेच शासन दरबारी वारकऱ्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी परिषद सातत्याने कार्यरत असल्याचे त्यांनी सांगितले.

अनेक वारकऱ्यांना मानधन मिळवून देण्यात परिषदेने महत्त्वाची भूमिका बजावली असून सध्या काही वारकऱ्यांना दरमहा पाच हजार रुपयांचे मानधन मिळत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

रत्नाताई विठ्ठल महाकाळ यांची जुन्नर तालुका संघटकपदी निवड करण्यात आली. यावेळी भरत तांबे, धोंडीभाऊ महाराज पानसरे, अनंतराव गटकळ, प्रकाश नवले, तानाजी खराडे आणि तुकाराम महाराज ढोमसे यांनी मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विठ्ठल शितोळे यांनी केले, तर आभार रत्ना महाकाळ यांनी मानले.

### कार्यक्षमतेत वाढ होण्यासाठी फेरबदल

# पुणे ग्रामीणमध्ये ३० पोलिस अधिकाऱ्यांच्या बदल्या

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** पुणे ग्रामीणचे जिल्हा पोलिस अधीक्षक संदीपसिंह गिल यांनी जिल्ह्यातील ३० पोलिस निरीक्षक व सहाय्यक पोलिस निरीक्षकांच्या बदल्यांचे आदेश सोमवारी जारी केले. या बदल्यांमध्ये बारामती तालुका पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांची शिक्रापूर येथे बदली करण्यात आली असून त्यांच्या जागी नारायण पवार यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

बदल्यांमध्ये पोलिस निरीक्षक दत्तात्रय गुंड यांची नियंत्रण कक्षातून जुन्नर येथे, कुमार कदम यांची सासवडहून रांजणगाव एमआयडीसी येथे, विनोद पाटील यांची नियंत्रण कक्षातून शिरूर येथे, सचिन पाटील यांची नियंत्रण कक्षातून लोणावळा शहर येथे, तर राजेश रामाघरे यांची लोणावळा शहरातून हवेली येथे नियुक्ती करण्यात आली आहे. संतोष तासगावकर यांची आर्थिक गुन्हे शाखेतून यवत येथे, हेमंत शेडगे यांची नियंत्रण कक्षातून दौंड येथे, विजयमाला पवार यांची जिल्हा विशेष शाखेतून उरुळी कांचन येथे, संतोष जाधव यांची जिल्हा वाहतूक शाखेतून राजगड येथे बदली करण्यात आली आहे. महादेव वाघमोडे यांची रांजणगाव एमआयडीसी येथून आर्थिक गुन्हे शाखेत, संदेश केंजळे यांची शिरूर येथून आर्थिक गुन्हे शाखेत, वैशाली पाटील यांची हवेली येथून महिला कक्षात, नारायण देशमुख यांची यवत येथून एफआरओ, पुणे ग्रामीण येथे नियुक्ती करण्यात आली आहे.

राजेश गवळी यांची राजगड येथून अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक विभागात, नीलेश माने यांची बारामती वाहतूक शाखेतून भोर येथे, संतोष घोळवे यांची टीएमसी पुणे ग्रामीण येथून सासवड येथे, रवींद्र पाटील यांची एफआरओ पुणे ग्रामीण येथून जेजुरी येथे, तर नारायण पवार यांची नियंत्रण कक्षातून बारामती तालुका पोलिस ठाण्यात नियुक्ती करण्यात आली आहे. याशिवाय महेश मेश्राम यांची सुरक्षा शाखेतून सायबर पोलिस ठाण्यात, गोपाळ पवार यांची दौंड येथून जिल्हा वाहतूक शाखेत, महेश स्वामी यांची नियंत्रण कक्षातून बारामती वाहतूक शाखेत, दिपरतन गायकवाड यांची शिक्रापूर येथून जिल्हा विशेष शाखेत आणि विकास भुजबळ यांची नियंत्रण कक्षातून सुरक्षा शाखेत बदली करण्यात आली आहे.

सहाय्यक पोलिस निरीक्षकांमध्ये नागनाथ पाटील यांची वडगाव निंबाळकर येथून नियंत्रण कक्षात, दिपक वाघचौरे यांची जेजुरी येथून आर्थिक गुन्हे शाखेत, जीवन मोहिते यांची इंदापूर येथून वडगाव निंबाळकर येथे, सोमनाथ शेंडगे यांची नियंत्रण कक्षातून भिगवण येथे, कुलदीप संकपाळ यांची स्थानिक गुन्हे शाखेतून माळेगाव येथे आणि विनोद महांगडे यांची भिगवण येथून आर्थिक गुन्हे शाखेत बदली करण्यात आली आहे. जिल्ह्यातील पोलिस प्रशासन अधिक सक्षम व कार्यक्षम करण्याच्या उद्देशाने या बदल्या करण्यात आल्याचे सांगण्यात आले.

## डिंभेतील उपयुक्त पाणीसाठी केवळ ७.६७ टक्क्यांवर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर :** उत्तर पुणे जिल्ह्यातील कुकडी प्रकल्पाची जीवनवाहिनी मानल्या जाणाऱ्या हुतात्मा बाबू गेनू सागर अर्थात डिंभे धरणातील पाणीसाठा चिंताजनक पातळीवर पोहोचला आहे. रविवारी धरणात केवळ ७.६७ टक्के उपयुक्त पाणीसाठा शिल्लक असल्याची नोंद झाली असून पिण्याचे पाणी आणि शेतीसाठी अडचणी निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

कडक उन्हाळा, वाढते तापमान आणि पाण्याचा वाढता वापर यामुळे धरणातील साठा झपाट्याने कमी होत आहे. गेल्या वर्षी याच कालावधीत मान्सून सक्रिय झाल्याने धरणातील पाणीसाठा ११.६७ टक्क्यांपर्यंत वाढला होता. यंदा मान्सूनच्या आगमनाला विलंब होत असल्याने परिस्थिती चिंताजनक बनली आहे. कुकडी प्रकल्पातील सर्वात मोठे धरण असलेल्या डिंभे धरणावर आंबेगाव, जुन्नर, शिरूर, पारनेर, श्रीगोंदा आणि कर्जत तालुक्यांतील मोठा भाग अवलंबून आहे. या धरणातून पिण्याच्या पाण्यासह शेती आणि विविध योजनांना पाणीपुरवठा केला जातो. त्यामुळे धरणातील साठा वेगाने घटत असल्याने जलव्यवस्थापनाचे मोठे आव्हान निर्माण झाले आहे. डिंभेसह कुकडी प्रकल्पातील इतर धरणांमधील पाणीसाठाही कमी होत असल्याने चिंता वाढली आहे.

## सारांश वृत्त

### युरोपमधील निर्यात कायम राहणार

**नवी दिल्ली :** युरोपियन युनियनने आपल्या सुधारित नियामक चौकटीनुसार भारताला मत्स्यशेती उत्पादने, अंडी, मध आणि प्राण्यांच्या आवरणांच्या निर्यातीसाठी मान्यता कायम ठेवली आहे. सप्टेंबर २०२६ नंतरही ईयूच्या २७ सदस्य देशांमध्ये ही उत्पादने निर्यात करण्यास भारत पात्र राहणार असल्याची माहिती वाणिज्य मंत्रालयाने सोमवारी दिली.

### तस्कराची मालमत्ता गोठवली

**जयपूर :** राजस्थान पोलिसांनी अंमली पदार्थांच्या तस्करीविरोधात सुरू असलेल्या विशेष मोहिमेंतर्गत प्रतापगड जिल्ह्यातील एका कथित तस्कराची सुमारे ८० लाख रुपयांची मालमत्ता गोठवण्याची कारवाई केली आहे. असद इक्बाल असे संबंधित आरोपीचे नाव असून त्याच्याविरोधात अंमली पदार्थ तस्करीशी संबंधित गुन्हे दाखल आहेत. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीकडून बेकायदेशीर मार्गाने मिळविण्यात आलेल्या मालमत्तेची माहिती संकलित करून ती गोठविण्याचा प्रस्ताव रठांजना पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी विजेंद्र सिंह यांनी नवी दिल्लीतील 'सेफमा' आणि एनडीपीएस कायद्यांतर्गत प्राधिकरणाकडे पाठविला होता. त्यानंतर कारवाई करण्यात आली.

### मालगाडीचे तीन डबे रुळावरून घसरले

**कुरुक्षेत्र :** हरियाणाचे मुख्यमंत्री नायब सिंह सैनी विशेष रेल्वेला हिरवा झेंडा दाखविण्याच्या कार्यक्रमासाठी उपस्थित असताना सोमवारी कुरुक्षेत्र रेल्वे स्थानकाजवळ मालगाडीचे तीन डबे रुळावरून घसरल्याची घटना घडली. या अपघातामुळे रेल्वे वाहतुकीवर काही प्रमाणात परिणाम झाला. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, कैथलच्या दिशेने येणारी मालगाडी कुरुक्षेत्र स्थानकाजवळ पोहोचत असताना तिचे तीन डबे रुळावरून घसरले. या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. डब्यांच्या चाकांचे मोठे नुकसान झाले आहे. हे डबे विद्युत खांबाला धडकल्याचा अंदाज करण्यात आला आहे.

## २० खासदारांनी एनडीएला पाठिंबा दिल्याचा दावा

# तृणमूल काँग्रेसमध्ये उभी फूट?

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** तृणमूल काँग्रेसमधील अंतर्गत मतभेदांच्या चर्चांना सोमवारी नवे वळण मिळाले. पक्षाच्या ज्येष्ठ खासदार काकोली घोष दस्तीदार यांनी सुमारे २० लोकसभा खासदारांनी राष्ट्रीय लोकशाही आघाडीला (एनडीए) पाठिंबा देण्याचा निर्णय घेतल्याचा दावा केला. या संदर्भात लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना पत्र पाठविण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

पश्चिम बंगाल विधानसभेतील अलीकडील घडामोडींनंतर हा दावा समोर आला आहे. काही दिवसांपूर्वी तृणमूल काँग्रेसच्या आमदारांमधील मतभेद चर्चेचा विषय ठरले होते. त्यानंतर आता संसदीय पातळीवरही पक्षात अस्वस्थता असल्याची चर्चा सुरू झाली आहे.

दरम्यान, तृणमूल काँग्रेसमध्ये अंतर्गत मतभेद वाढल्याच्या चर्चेला सोमवारी नवे वळण मिळाले. राज्यसभा खासदार सुखेंदू शेखर रे यांनी खासदारपदासह पक्षाच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिल्याची माहिती समोर आली आहे. या घडामोडीमुळे पक्षांतर्गत अस्वस्थतेबाबत सुरू असलेल्या चर्चांना अधिक बळ मिळाले आहे.

काकोली घोष दस्तीदार यांनी वृत्तसंस्थेशी बोलताना, माझ्यासह सुमारे २० खासदारांनी एनडीएला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला असून त्याबाबत लोकसभा अध्यक्षांना कळविण्यात आले आहे, असे सांगितले. त्यांनी स्वतःला लोकसभेतील पक्षाचे मुख्य प्रतोद असल्याचाही दावा केला. सूत्रांच्या माहितीनुसार, असंतुष्ट खासदारांचा गट लोकसभा अध्यक्षांसमोर आपली भूमिका मांडण्याच्या तयारीत आहे. पक्षाच्या नेतृत्वाने संसदीय प्रक्रियेचे पालन न करता काही बदल केल्याचा त्यांचा आरोप असल्याचे सांगितले जात आहे.

दरम्यान, तृणमूल काँग्रेसच्या नेतृत्वाने यापूर्वी काकोली घोष दस्तीदार यांच्याकडील मुख्य प्रतोदपदाची जबाबदारी काढून ती कल्याण बॅनर्जी यांच्याकडे सोपविण्याचा निर्णय घेतल्याची चर्चा आहे. मात्र, घोष दस्तीदार यांनी आपण अद्यापही मुख्य प्रतोद असल्याचा दावा कायम ठेवला आहे.

असंतुष्ट खासदारांनी तृणमूल काँग्रेसचा राजीनामा देणार नसल्याचेही स्पष्ट केल्याचे सूत्रांनी सांगितले. तसेच भारतीय जनता पक्षात प्रवेश न करता स्वतंत्र संसदीय गट म्हणून काम करत एनडीएला पाठिंबा देण्याची भूमिका त्यांनी स्वीकारल्याचे बोलले जात आहे.

लोकसभेत सध्या तृणमूल काँग्रेसचे २८ खासदार आहेत. त्यापैकी २० खासदारांचा पाठिंबा असल्याचा दावा खरा ठरल्यास पक्षांतरविरोधी कायद्यातील दोन-तृतीयांश सदस्यसंख्येची अट पूर्ण होऊ शकते. त्यामुळे या घडामोडींना विशेष राजकीय महत्त्व प्राप्त झाले आहे. या पार्श्वभूमीवर नवी दिल्लीत असंतुष्ट खासदारांची बैठक झाल्याचे वृत्त आहे. त्यामुळे पक्षाध्यक्ष ममता बॅनर्जी यांच्यासमोरील संघटनात्मक आणि संसदीय आव्हाने अधिक गंभीर झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. मात्र, या दाव्यांबाबत तृणमूल काँग्रेसच्या अधिकृत नेतृत्वाकडून अद्याप कोणतीही सविस्तर प्रतिक्रिया समोर आलेली नाही. त्यामुळे पुढील काही दिवसांत या घडामोडी कोणते वळण घेतात, याकडे राजकीय निरीक्षकांचे लक्ष लागले आहे.

## छत्तीसगडमध्ये जंगली हत्तीचा हल्ला; २ जण ठार

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**रायपूर :** छत्तीसगडमधील गुरु घासीदास-तमोर पिंगला व्याघ्र प्रकल्प परिसरात जंगली हत्तीच्या हल्ल्यात दोन बांधकाम कामगारांचा मृत्यू झाला. मनेंद्रगड-चिरमिरी-भरतपूर (एमसीबी) जिल्ह्यातील देवसिल गावाजवळ रविवारी रात्री उशिरा ही दुर्दैवी घटना घडली.

अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, रस्ते बांधकामाच्या कामात गुंतलेले मजूर रात्रीचे जेवण आटोपल्यानंतर विश्रांती घेत होते. त्यांनी शेकोटी पेटवली होती आणि तिच्याजवळ बसले असताना अचानक जंगलातून एक हत्ती बाहेर आला आणि त्याने कामगारांवर हल्ला चढविला. या हल्ल्यात २२ वर्षीय गौरव यांचा जागीच मृत्यू झाला. तर गंभीर जखमी झालेल्या अमर सिंह (वय ३५) यांचा उपचारासाठी सोनहाट रुग्णालयात नेत असताना सोमवारी पहाटे मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच व्याघ्र प्रकल्पातील वन विभागाचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी पंचनामा आणि इतर आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया सुरू केल्या.

मृत कामगार कोरिया जिल्ह्यातील रामगड आणि एमसीबी जिल्ह्यातील कोटाडोल यांना जोडणाऱ्या रस्त्याच्या बांधकाम प्रकल्पावर कार्यरत होते. हा हल्ला एमसीबी जिल्ह्यातील जंगल परिसरात झाला.

वन विभागाने मृतांच्या कुटुंबीयांना तत्काळ २५ हजार रुपयांची मदत देण्याची घोषणा केली आहे. तसेच सर्व प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर प्रत्येक मृताच्या कुटुंबाला ५ लाख ७५ हजार रुपयांची अतिरिक्त भरपाई देण्यात येणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. व्याघ्र प्रकल्प परिसरात गेल्या काही वर्षांत मानव-वन्यजीव संघर्षाच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. उत्तर छत्तीसगडमध्ये मानव-हत्ती संघर्ष ही गंभीर समस्या बनली आहे.

## भारतीयांसाठी सतर्कतेचा इशारा

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**तेल अवीव :** इस्रायल आणि इराण यांच्यातील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर इस्रायलमधील भारतीय नागरिकांसाठी भारतीय दूतावासाने महत्त्वपूर्ण सल्लागार सूचना जारी केल्या आहेत. सर्व भारतीयांनी अत्यंत सावधगिरी बाळगावी, सतर्क राहावे आणि स्थानिक प्रशासनाच्या सूचनांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन दूतावासाने केले आहे.

दरम्यान, भारताने सोमवारी नागरिकांना इराणचा प्रवास टाळण्यास सांगितले असून इराणमधील भारतीयांनी उपलब्ध वाहतुकीच्या साधनांचा वापर करून लवकरात लवकर तेथून बाहेर पडण्याचे आवाहन केले आहे.

सोमवारी जारी करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांमध्ये इस्रायलमधील सध्याची सुरक्षा परिस्थिती लक्षात घेता भारतीय नागरिकांनी कोणतीही जोखीम न घेण्याचा सल्ला देण्यात आला आहे. तसेच पुढील सूचना मिळेपर्यंत सर्व अनावश्यक प्रवास टाळण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

भारतीय दूतावासाने नागरिकांना इस्रायली प्रशासन आणि होम फ्रंट कमांडकडून जारी करण्यात येणाऱ्या सुरक्षा मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करण्यास सांगितले आहे. तसेच प्रत्येकाने आपल्या निवासस्थानाजवळील किंवा कार्यस्थळाजवळील सुरक्षित आश्रयस्थाने आणि संरक्षित जागांची माहिती करून घ्यावी, असेही नमूद करण्यात आले आहे. दूतावासाने भारतीयांना स्थानिक वृत्तवाहिन्या, अधिकृत घोषणा आणि आपत्कालीन इशाऱ्यांवर सतत लक्ष ठेवण्याचा सल्ला दिला आहे. परिस्थितीनुसार त्वरित सुरक्षित स्थळी जाण्यासाठी तयार राहण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

## पश्चिम आशियातील वाढत्या तणावावर चिंता

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** पश्चिम आशिया आणि आखाती प्रदेशातील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर भारताने सोमवारी पुन्हा एकदा सर्व संबंधित पक्षांना तातडीने तणाव कमी करण्याचे आवाहन केले. या घडामोडी आंतरराष्ट्रीय समुदायासाठी अत्यंत चिंतेचा विषय असल्याचे नमूद करत भारताने शांतता आणि स्थैर्य पुनर्स्थापित करण्यासाठी राजनैतिक मार्गाने तोडगा काढण्यावर भर दिला.

परराष्ट्र मंत्रालयाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पश्चिम आशियात झालेल्या नव्या हल्ल्यांबाबत भारताला तीव्र चिंता वाटत आहे. हा संघर्ष शंभर दिवसांहून अधिक काळ सुरू असून त्यामुळे मोठ्या प्रमाणावर मानवी हानी आणि हालअपेष्टा निर्माण झाल्या आहेत. त्याचबरोबर जागतिक अर्थव्यवस्था आणि ऊर्जा पुरवठा व्यवस्थेवरही त्याचा प्रतिकूल परिणाम होत असल्याचे भारताने नमूद केले.

भारताने सर्व पक्षांना तातडीने शत्रुत्व कमी करण्याचे, नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य देण्याचे आणि सुरू असलेल्या राजनैतिक वाटाघाटींना यशस्वी करून प्रदेशात शांतता व स्थैर्य प्रस्थापित करण्याचे आवाहन केले आहे. गेल्या २४ तासांत पश्चिम आशियात लष्करी तणावात मोठी वाढ झाल्याचे वृत्त आहे. विविध शहरांमध्ये हवाई हल्ले, क्षेपणास्त्र प्रहार आणि सामरिक ठिकाणांवरील कारवायांमुळे परिस्थिती अधिक गंभीर बनली आहे.

दरम्यान, इस्रायल आणि इराण यांच्यातील संघर्षाने सोमवारी शंभर दिवसांचा टप्पा ओलांडला. दोन्ही देशांकडून सुरू असलेल्या हल्ले आणि प्रतिहल्ल्यांमुळे आधीच नाजूक स्थितीत असलेला युद्धविराम धोक्यात आला असून व्यापक प्रादेशिक संघर्षाची भीती व्यक्त केली जात आहे. माध्यमांच्या वृत्तानुसार, इराणसमर्थित हौथी गटाने लाल समुद्रातील इस्रायली जहाजांवर निर्बंध लावण्याची घोषणा केली आहे. त्याचवेळी इराण आणि इस्रायल यांच्यात परस्पर लक्ष्यांवर हल्ल्यांची मालिका सुरू राहिल्याचे वृत्त आहे. वाढत्या संघर्षामुळे युद्ध संपविण्यासाठी सुरू असलेल्या राजनैतिक प्रयत्नांनाही धक्का बसण्याची शक्यता आहे. इराणबरोबर अणुकरार घडवून आणण्यासाठी अमेरिकेकडून सुरू असलेल्या प्रयत्नांवरही या तणावाचा परिणाम होऊ शकतो, अशी चिंता व्यक्त केली जात आहे. परिस्थिती अधिक चिघळू नये आणि जागतिक स्थैर्यावर त्याचे गंभीर परिणाम होऊ नयेत, यासाठी आंतरराष्ट्रीय समुदायाकडूनही शांततामय तोडग्यासाठी प्रयत्न वाढविण्याची गरज व्यक्त होत आहे.

## फिलीपिन्समध्ये ७.८ तीव्रतेचा भूकंप; १२ जण ठार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मनिला :** दक्षिण फिलीपिन्समध्ये सोमवारी सकाळी ७.८ तीव्रतेचा शक्तिशाली भूकंप झाला. या नैसर्गिक आपत्तीत किमान १२ जणांचा मृत्यू झाला असून २०० हून अधिक जण जखमी झाले आहेत. भूकंपामुळे अनेक इमारतींचे नुकसान झाले, तर किनारपट्टी भागात सुमारे एक मीटर उंचीच्या त्सुनामी लाटा उसळल्या.

पॅसिफिक त्सुनामी चेतावणी केंद्राने दिलेल्या माहितीनुसार, मिंडानाओ बेटाच्या दक्षिण भागात भूकंपानंतर सुमारे पाच तासांनी त्सुनामीचा धोका मोठ्या प्रमाणात कमी झाला. फिलीपिन्स ज्वालामुखी आणि भूकंप विज्ञान संस्थेचे संचालक टेरेसिटो बॅकोलकोल यांनी त्सुनामीमुळे कोणतीही जीवितहानी झालेली नसल्याचे सांगितले.

भूकंपामुळे मोठ्या प्रमाणावर मालमत्तेचे नुकसान होण्याची शक्यता असून अनेक इमारतींना तडे गेल्याचे आणि काही इमारतींचे नुकसान झाल्याचे प्राथमिक अहवालांवरून स्पष्ट होत असल्याचे बॅकोलकोल यांनी सांगितले. फिलीपिन्स ज्वालामुखी आणि भूकंप विज्ञान संस्थेच्या माहितीनुसार, यंदाच्या वर्षातील हा देशाला बसलेला सर्वात शक्तिशाली भूकंप ठरला आहे. सारंगनी प्रांतातील मासिम शहराच्या नैऋत्येस सुमारे ३२ किलोमीटर अंतरावर समुद्रात, ३३ किलोमीटर खोलीवर या भूकंपाचा केंद्रबिंदू होता. सुमारे सात लाख लोकसंख्या असलेल्या जनरल सँटोस या दक्षिणेकडील बंदर शहराला सर्वाधिक फटका बसला. हे शहर ट्यूना मासे निर्यात उद्योग आणि इतर व्यावसायिक व्यवहारांचे प्रमुख केंद्र मानले जाते. फिलीपिन्सचे अध्यक्ष फर्डिनांड मार्कोस ज्युनियर यांनी सरकार मदतीसाठी सर्वतोपरी प्रयत्न करीत असून प्रभावित नागरिकांना आवश्यक ती मदत पुरविण्यात येईल, असे आश्वासन दिले.

## सर्वोच्च न्यायालयाचे महत्त्वपूर्ण निरीक्षण

# संमतीच्या संबंधांवर प्रश्नचिन्ह नको

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** अविवाहित प्रौढांमधील शारीरिक संबंध हे संबंधित व्यक्तीच्या चारित्र्यावर प्रतिकूल ठसा उमटवण्याचे कारण ठरू शकत नाहीत, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने नोंदविले आहे. अशा संबंधांमुळे एखाद्या व्यक्तीच्या नैतिकतेवर किंवा चारित्र्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित करणे योग्य नसल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.

न्यायमूर्ती मनमोहन आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांच्या खंडपीठाने हा निर्णय देताना तेलंगणा राज्यस्तरीय पोलिस भरती मंडळाला एका उमेदवाराची पोलिस कॉन्स्टेबलपदी नियुक्ती करण्याचे निर्देश दिले. अयशस्वी प्रेमसंबंधातून उद्भवलेल्या गुन्हेगारी प्रकरणात नाव आल्यामुळे संबंधित उमेदवाराची नियुक्ती रद्द करण्यात आली होती. न्यायालयाने नमूद केले की, दोन अविवाहित प्रौढांना परस्पर संमतीने संबंध ठेवण्यास कोणताही कायदा प्रतिबंध करत नाही. त्यामुळे अशा संबंधांच्या आधारे संबंधित व्यक्तीच्या चारित्र्याबाबत प्रतिकूल निष्कर्ष



काढणे योग्य ठरणार नाही.

सर्वोच्च न्यायालयाने उमेदवाराचे अपील मंजूर करताना तेलंगणा उच्च न्यायालयाच्या एकल न्यायाधीशांनी दिलेल्या आदेशालाही दुजोरा दिला. त्या आदेशात संबंधित उमेदवाराच्या स्टायपेंडरी कॅडेट ट्रेनी पोलिस कॉन्स्टेबल पदावरील नियुक्तीचा पुनर्विचार करण्याचे निर्देश देण्यात आले होते.

तेलंगणा राज्यस्तरीय पोलिस भरती मंडळाने २०१४ मध्ये लग्नाचे आश्वासन देऊन बलात्कार केल्याच्या आरोपावरून उमेदवाराची नियुक्ती रद्द केली होती. हा प्रकार नैतिक अधःपतन दर्शवित असल्याचे मंडळाचे म्हणणे होते. मात्र, न्यायालयाने नोंदवले की हे प्रकरण शेजारी राहणाऱ्या युवक-युवतीमधील प्रेमसंबंधातून उद्भवले होते. दोघेही सुमारे चार वर्षे संबंधात होते. नंतर दोन्ही पक्षांमध्ये समझोता झाल्यानंतर २०१५ मध्ये लोकअदालतीत प्रकरण निकाली काढण्यात आले. भारतीय दंड संहितेच्या कलम ३७६ अंतर्गत कोणतेही आरोपपत्र दाखल झाले नव्हते. प्रत्येक प्रेमसंबंधाचा शेवट विवाहातच होईल असे नाही. केवळ विवाह झाला नाही म्हणून एका व्यक्तीने दुसऱ्याची फसवणूक केली, असा निष्कर्ष काढता येत नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले. तडजोडीसाठी दबाव, धमकी किंवा बळाचा वापर झाल्याचे कोणतेही पुरावे उपलब्ध नसल्याचेही खंडपीठाने नमूद केले. त्यामुळे संबंधित उमेदवाराच्या चारित्र्याबाबत प्रतिकूल निष्कर्ष काढण्यास आधार नसल्याचे न्यायालयाने म्हटले.

फौजदारी न्यायशास्त्रातील मूलभूत तत्त्वांचा उल्लेख करताना न्यायालयाने स्पष्ट केले की, न्यायालयात आरोप सिद्ध होईपर्यंत प्रत्येक व्यक्ती निर्दोष मानली जाते. केवळ संशयाच्या आधारे संबंधित व्यक्तीच्या चारित्र्यावर प्रश्न उपस्थित करणे योग्य ठरणार नाही, असेही सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निर्णयात नमूद केले.

## आंध्रात ६,६८८ गावांचे पुनर्सर्वेक्षण पूर्ण

**जम्मू :** जम्मू अमरावती आंध्र प्रदेश सरकारने राज्यातील जमिनीच्या नोंदी अद्ययावत करण्यासाठी हाती घेतलेल्या पुनर्सर्वेक्षण मोहिमेत मोठी प्रगती साधली असून ६,६८८ गावांमधील काम पूर्ण झाले आहे. ही माहिती मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांनी दिली. एका कार्यक्रमात बोलताना नायडू म्हणाले की, पुनर्सर्वेक्षणामुळे जमिनीच्या नोंदी अचूक आणि अद्ययावत करण्यात यश आले आहे. आतापर्यंत २६.४ लाख नागरिकांना पासबुक वितरित करण्यात आली आहेत.

## सेवा सुरळीत असल्याचा सीबीएसईचा दावा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने (सीबीएसई) निकालोत्तर सेवा पोर्टलबाबत सुरू असलेल्या चर्चांवर सोमवारी स्पष्टीकरण देत, निर्धारित कालावधीत पोर्टल पूर्णपणे कार्यरत होते आणि लाखो विद्यार्थ्यांनी त्याचा यशस्वी वापर केल्याचा दावा केला आहे.

सीबीएसईने जारी केलेल्या निवेदनानुसार, २ ते ७ जून या कालावधीत उत्तरपत्रिकांची पडताळणी, छायाप्रती मिळविणे आणि पुनर्मूल्यांकनासाठी अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध होती. या कालावधीत १.६ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी ३.८ लाखांपेक्षा जास्त उत्तरपत्रिकांसंदर्भात अर्ज सादर केले. मंडळाने सांगितले की, ही प्रणाली सरकारी तांत्रिक संस्थांच्या आणि आयआयटीच्या तज्ज्ञांच्या देखरेखीखाली कार्यरत होती. तसेच सायबर सुरक्षा पथकांकडून संपूर्ण कालावधीत पोर्टलवर लक्ष ठेवण्यात आले होते, जेणेकरून सायबर हल्ले किंवा दुर्भावनापूर्ण हस्तक्षेप रोखता येतील.

निकालोत्तर सेवा पोर्टलच्या कार्यक्षमतेबाबत काही माध्यमांमध्ये आणि समाजमाध्यमांवर प्रश्न उपस्थित करण्यात आले होते. त्यावर उत्तर देताना सीबीएसईने स्पष्ट केले की, 'रोल नंबर सापडला नाही' हा संदेश केवळ अशा विद्यार्थ्यांना दिसतो ज्यांनी उत्तरपत्रिकेची छायाप्रती मिळविण्याच्या पहिल्या टप्प्यात अर्ज केलेला नसतो. मंडळाने स्पष्ट केले की, ज्यांनी उत्तरपत्रिकेच्या स्कॅन केलेल्या प्रतींसाठी अर्ज केला होता, त्यांनाच पुढील टप्प्यात पडताळणी आणि पुनर्मूल्यांकनासाठी अर्ज करण्याची पात्रता होती. दरम्यान, काही बारावीच्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या उत्तरपत्रिकांच्या स्कॅन केलेल्या प्रतींमधील हस्ताक्षर स्वतःच्या लेखनाशी जुळत नसल्याचा दावा केला आहे. त्यामुळे संभाव्य त्रुटींबाबत प्रश्न उपस्थित झाले आहेत.

या पार्श्वभूमीवर गेल्या आठवड्यात केंद्रीय मंत्रिमंडळ सचिवालयाने ऑनलाइन सेवा व्यवस्थेसाठी करण्यात आलेल्या सेवाखरेदी प्रक्रियेची चौकशी करण्यासाठी एक सदस्यीय समिती स्थापन करण्याची घोषणा केली होती. सीबीएसईने मात्र विद्यार्थ्यांना आवश्यक मदत पुरविण्यात आल्याचा दावा केला आहे.

## वादग्रस्त जहांगीर खान अटकेत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता :** पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीदरम्यान वादाच्या केंद्रस्थानी राहिलेले तृणमूल काँग्रेसचे माजी उमेदवार जहांगीर खान उर्फ पुष्पा यांना पोलिसांनी अटक केली आहे. पश्चिम बंगाल पोलिसांच्या विशेष कृती दलाने भारत-नेपाळ सीमेजवळ ही कारवाई केली. अलीकडेच कलकत्ता उच्च न्यायालयाने त्यांना अंतरिम दिलासा देण्यास नकार दिला होता.

जहांगीर खान हे दक्षिण २४ परगणा जिल्ह्यातील फाल्टा मतदारसंघातून तृणमूल काँग्रेसचे उमेदवार होते. निवडणुकीदरम्यान त्यांच्यावर हिंसाचार, धमकी आणि निवडणूक प्रक्रियेत हस्तक्षेप केल्याचे आरोप करण्यात आले होते. या मतदारसंघातील मतदान प्रक्रियेबाबत तक्रारी आल्यानंतर फेरनिवडणूक घेण्यात आली होती. त्यानंतर झालेल्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने विजय मिळवला, तर जहांगीर खान यांना पराभवाचा सामना करावा लागला.

पोलिसांच्या माहितीनुसार, जहांगीर खान यांच्याविरुद्ध धमकी देणे, खंडणी उकळणे, हिंसाचार घडवून आणणे आणि कायदा-सुव्यवस्था बिघडविण्यासह विविध स्वरूपाचे गुन्हे फाल्टा पोलिस ठाण्यात नोंद आहेत. निवडणुकीनंतर ते फरार होते.

जहांगीर खान यांना पुष्पा या टोपणनावाने संबोधले जात होते. पोलिसांना ते नेपाळमार्गे देशाबाहेर जाण्याच्या तयारीत असल्याची माहिती मिळाल्यानंतर त्यांना ताब्यात घेण्यात आले.

## साहसी व जलपर्यटनाचे नवे केंद्र म्हणून उदय

# स्वदेश दर्शन योजनेमुळे टिहरी जलपर्यटन लोकप्रिय

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** केंद्र सरकारच्या स्वदेश दर्शन योजनेअंतर्गत झालेल्या व्यापक विकासकामांमुळे उत्तराखंडमधील टिहरी हे देशातील प्रमुख साहसी आणि जलपर्यटन केंद्र म्हणून उदयास आले आहे. टिहरी धरण आणि कृत्रिम टिहरी तलावासाठी प्रसिद्ध असलेल्या या जिल्ह्याच्या यशस्वी पर्यटन विकास मॉडेलची दखल घेत पर्यटन मंत्रालयाने इतर राज्यांनाही त्याचा आदर्श घेण्याचे आवाहन केले आहे.

मसुरीवरील वाढता पर्यटन भार कमी करण्यासाठी आणि पर्यावरणपूरक पर्यायी पर्यटनस्थळ विकसित करण्याच्या उद्देशाने टिहरी प्रकल्पाची संकल्पना मांडण्यात आली होती. पर्यटनाभिमुख पायाभूत सुविधा आणि सार्वजनिक गुंतवणुकीच्या माध्यमातून नैसर्गिक व मानवनिर्मित संसाधनांचे शाश्वत पर्यटन केंद्रात रूपांतर कसे करता येते, याचे प्रभावी उदाहरण टिहरीने निर्माण केले आहे.

पर्यटन मंत्रालयातील अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, काही वर्षांपूर्वी मसुरीमध्ये पर्यटकांची संख्या झपाट्याने वाढल्याने वाहतूक कोंडी आणि गर्दीची समस्या निर्माण झाली होती. त्यावेळी मसुरीपासून सुमारे ७५ किलोमीटर अंतरावरील टिहरीमध्ये पर्यायी पर्यटनस्थळ विकसित करण्यासाठी केंद्र सरकारने तरंगत्या निवास सुविधा आणि इतर पर्यटन प्रकल्पांसाठी निधी उपलब्ध करून दिला.

पूर्वी टिहरी तलावाचा वापर प्रामुख्याने मत्स्य व्यवसायासाठी होत होता. मात्र आता या तलावात तरंगते रिसॉर्ट, तरंगते उपाहारगृह आणि विविध जलक्रीडा सुविधा विकसित करण्यात आल्या आहेत. त्यामुळे पर्यटकांची संख्या वाढू लागल्यानंतर खासगी गुंतवणूकदारही पुढे आले. स्थानिक नागरिकांनी आपल्या घरांचे होमस्टेमध्ये रूपांतर केले असून पर्यटनामुळे स्थानिक रोजगार आणि अर्थव्यवस्थेलाही चालना मिळाली आहे.

पर्यटन मंत्रालयाने जानेवारी २०१५ मध्ये स्वदेश दर्शन योजना सुरू केली होती. संकल्पनाधारित पर्यटन सर्किटच्या विकासासाठी राबविण्यात आलेल्या या योजनेअंतर्गत देशभरातील ७६ प्रकल्पांना ५,२९०.३३ कोटी रुपयांची मंजुरी देण्यात आली होती. यापैकी ७५ प्रकल्प पूर्ण झाले आहेत. शाश्वत आणि जबाबदार पर्यटनस्थळांच्या विकासासाठी २०२२ मध्ये स्वदेश दर्शन २.० ही सुधारित योजना सुरू करण्यात आली. या टप्प्यात २,२०८.२७ कोटी रुपयांच्या ५३ प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली आहे. उत्तराखंड सरकारच्या आकडेवारीनुसार, टिहरीमध्ये गेल्या काही वर्षांत पर्यटकांच्या संख्येत सातत्याने वाढ झाली आहे. २०२१ मध्ये येथे ४.९२ लाख पर्यटक आले होते. २०२२ मध्ये ही संख्या २७.४६ लाखांवर पोहोचली, तर २०२३ मध्ये ३७.६१ लाख पर्यटकांनी भेट दिली. २०२४ मध्ये ५३.२९ लाख पर्यटकांच्या आगमनासह टिहरी हे तिसरे सर्वाधिक लोकप्रिय पर्यटनस्थळ ठरले. २०२५ मध्ये उत्तराखंडमध्ये सहा कोटींहून अधिक पर्यटकांनी भेट दिली. हरिद्वारमध्ये सर्वाधिक ३.४२ कोटी पर्यटक आले, तर देहरादूनमध्ये ६७.३५ लाख पर्यटकांची नोंद झाली. टिहरीतील पर्यटनवाढीमुळे या प्रदेशाचे महत्त्व सातत्याने वाढत आहे. उत्तराखंड सरकारने अलीकडेच 'एक राज्य, एक जागतिक गंतव्यस्थान' या उपक्रमांतर्गत टिहरी तलाव परिसराला जागतिक दर्जाचे पर्यटनस्थळ म्हणून विकसित करण्याची घोषणा केली आहे.